CMYK

LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी
9422295333
8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.,
५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ११ वा फोन २३०१०१ दिनांक ९ डिसेंबर २०२५ मंगळवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४ रु.

## धनंजय मुंडे मुख्यमंत्र्यांना भेटले, उपमुख्यमंत्री अजितदादाही होते

# १ लाख ४० हजार मतांनी निवडून आलोय, मतदार संघातील विकास कामांसाठी मुख्यमंत्र्यांना भेटलो



**बीड दि.८ (प्रतिनिधी):– नागपूर अधिवेशनाच्या धावपळीत माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतलेली भेट प्रसारमाध्यमांमध्ये चर्चेचा विषय बनली. यावर प्रतिक्रिया देतांना धनंजय मुंडे म्हणाले की, मी १ लाख ४० हजार मतांनी निवडून आलोय, माझी काही जबाबदारी आहे की नाही. बीडच्या संदर्भातील काही काम होते, त्यासाठी मी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आहे. आता आशा करतो की आता कामे लवकर होतील, असे त्यांनी सांगितले. या भेटीच्या वेळी मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला उपस्थित होत्या.**

माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी नागपूर अधिवेशनाच्या गडबडीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतलेली भेट ही माध्यमांमध्ये चर्चेचा विषय बनली. या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलतांना धनंजय मुंडे म्हणाले की, परळी विधानसभा मतदार संघातून मी १ लाख ४० हजार मतांनी विजयी झालेलो आहे. मतदार संघातील विविध विकास कामांच्या संदर्भात मी मुख्यमंत्र्यांना भेटलो, या बाबत पत्रही त्यांना दिले आहे. विनाकारण वेगळे अर्थ काढू नका. मागच्या १ वर्षापासून मी गप्प आहे. काही बोललो नाही परंतु टार्गेट करु नका. लोकप्रतिनिधी म्हणून माझी काही जबाबदारी आहे. माझ्या मतदार संघातील मतदारांनी माझ्यावर विश्वास ठेवून १ लाख ४० मतांनी निवडून दिले आहे, त्या अनुषंगाने मतदार संघातील कामा संदर्भात मुख्यमंत्र्यांना पत्र देखील दिलेले आहे. आता या कामांना गती मिळावी आणि ती वेळेत व्हावी अशी अपेक्षा धनंजयज मुंडे यांनी व्यक्त केली. यावेळी पत्रकारांनी त्यांना जरांगे पाटील यांनी केलेल्या आरोपांविषयी विचारले असता मुंडे यांनी त्यावर बोलण्यास नकार दिला. मी मनोज जरांगे यांच्या आरोपांवर बोलणार नाही, या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्यात आलेली आहे. मागील १ वर्षापासून मला टार्गेट केलं जात आहे. ते का करण्यात येत आहे याचा पान २ वर



## बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास कुटुंबातील एका नातलगाला मिळेल सरकारी नोकरी!

मुंबई दि.८ (प्रतिनिधी):- महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून बिबट्याने उच्छाद मांडला आहे. वाघांचे, बिबट्यांचे नागरिकांवर हल्ला करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. या हल्ल्यात कोणी आपल्या घरचा कर्ता पुरुष गमावला आहे तर कोणी लहान मुले, घरातली कमावती माणसे गमावल्याने अनेकांची आर्थिक परिस्थिती बिकट होत चालली आहे. गावागावांमध्ये नागरिक दहशतीच्या वातावरणात जगत आहेत. काळोख पडू लागताच नागरिक दारं, खिडक्या बंद करुन स्वतःला घरातच कोंडून घेऊ लागले आहेत. या पार्श्वभूमीवर वन विभागाने महत्वाचा प्रस्तावावर विचार करत आहे.

वाघ अथवा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास संबंधित व्यक्तीच्या कुटुंबातील एका नातलगाला सरकारी नोकरीचे देण्याच्या पान २ वर

## अतिक्रमणधारकांना सीओंची तंबी रस्ता अडवला तर थेट गुन्हे दाखल करणार

### सावता माळी चौकातील दत्त मंदिर ते डीपी रोडवरील सिमेंटचे पोल हटविले

बीड, दि. ८ (प्रतिनिधी) :- रस्ता अडवला तर थेट गुन्हे दाखल केले जातील, अशी तंबी बीड नगर पालिकेचे सीओ शैलेश फडसे यांनी दिली आहे. स्वतः सीओंनी बीडच्या सावता माळी चौकातील दत्त मंदिर ते डीपी रोड या रस्त्याचा स्पॉट पंचनामा करून या रस्त्यावरील सिमेंटचे पोल हटविले आहेत.

बीड शहरात सावता माळी चौकात असलेल्या दत्त मंदिर ते डीपी रोड परिसरामध्ये अतिशय महत्त्वाच्या या सार्वजनिक रस्त्यावर काही व्यक्तींनी अतिक्रमण केल्याचे पहायला मिळत होते. या प्रकरणात नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्यांकडे या भागात राहत असलेल्या नागरिकांनी लेखी तक्रार केली होती, दत्त मंदिर ते डीपी रोड परिसरातील रस्ता पूर्णपणे बंद करण्यात आला असून या ठिकाणी काही लोकांनी सार्वजनिक रस्त्यावर खाजगी प्लॉट म्हणून सिमेंटचे पूल लावले आहेत, तसेच रस्त्यावरच पाट्या आणि झेंडेही लावल्याचे पहायला मिळत होते, त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांना रहदारीसाठी त्रास सहन करावा लागत असे, गेल्या ३० ते ४० वर्षापासून वापरात पान २ वर

### सर्व मालमत्ताधारकांच्या कागदपत्रांची तपासणी केली जाणार अनेकांना बजावल्या नोटीसा

**सर्वे नंबर १९१, १९२ मधील अंतर्गत ही तक्रार आहे, येथे काही जणांनी वाहतूकीचा रस्ता बंद केला होता, या सर्वांना आम्ही नोटीस देणार आहोत, सदर मालमत्ताधारकांकडून कागदपत्र मागविण्यात आलेले आहेत. वास्तविकत: लेआऊट न करता अनाधिकृरित्या भुखंड पाडून प्लॉट विक्री केल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण केलेली आहे. त्यामुळे सर्व कागदपत्र पाहून, कुणी कसे अतिक्रमण केले याची तपासणी केली जाईल, त्यानंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याचे यावेळी सीओ शैलेश फडसे यांनी सांगितले आहे.**

## नगर पालिकेची मतमोजणी २१ डिसेंबरलाच, एमपीएससीचा पेपर पुढे ढकलला

बीड दि.८ (प्रतिनिधी):- नगर पालिका निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची मतमोजणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे २१ डिसेंबर २०२५ रोजीच होणार आहे. त्या दिवशी होणारी एमपीएससीची परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून ती परीक्षा नवीन वर्षाच्या पहिल्या रविवारी म्हणजेच ४ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

बीडसह राज्यभरातील नगर पालिकांसाठी झालेल्या मतदानाची मतमोजणी ही २१ डिसेंबर रोजीच होणार आहे. सोमवारी सोशल मीडियासह इतर माध्यमात मतमोजणी पुढे ढकलली, अशा काही पोस्ट व्हायरल झाल्याने संभ्रम निर्माण झाला होता. मात्र हा संभ्रम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दूर केला आहे. ज्या एमपीएससीच्या परीक्षेमुळे मतमोजणी पुढे ढकलली असा मेसेज व्हायरल होत होता ती एमपीएससीची महाराष्ट्र गट ब अराजपत्रित सेवा संयुक्त पुर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. २१ डिसेंबर रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पान २ वर

## सौ.लीला कालीदास पाठक यांचे निधन

बीड दि.८ (प्रतिनिधी):- सौ.लीला कालीदास पाठक



यांचे दि.६ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ८:३० वा.निधन रात्री साडेआठ वाजता निधन झाले. सौ.पाठक यांच्यावर दि.७ डिसेंबर रोजी दुपारी मोंढा स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पाठक त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, सून, नातवंडे, मुली असा परिवार आहे. पाठक परिवारावर कोसळलेल्या दु:खात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांचं निधन

पुणे दि.८ (प्रतिनिधी):- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा आढाव (वय ९५) यांचे सोमवारी रात्री निधन झाले. हमाल, रिक्षाचालक आणि बांधकाम मजुरांचे संघटन करून त्यांच्या न्यायासाठी लढणारे श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ ही त्यांची ओळख होती. त्यांच्यामागे पत्नी शीला आढाव, असीम आणि अंबर हे दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.



फुफ्फुसात बिघाड झाल्याने डॉ. बाबा आढाव यांच्यावर गेल्या दहा दिवसांपासून खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवण्यात आले होते. मात्र, वयोमानामुळे त्यांची प्रकृती उपचारांना पुरेसा प्रतिसाद देत नव्हती. उपचारांदरम्यान सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. पान २ वर

## डोळ्यात चटणी टाकून वाहनधारकांना लुटणारी टोळी गजाआड



बीड दि.८ (प्रतिनिधी):- रोडवरुन जाणाऱ्या वाहनधारकांना अडवून त्यांच्या डोळ्यात चटणी टाकून शस्त्राचा धाक दाखवून लूटमार करणाऱ्या टोळीला गजाआड करण्यात स्थानिक पोलीस शाखेला यश आले आहे. पोलिसांनी मोठ्या शिताफीने ही टोळी गजाआड केली असून त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरलेली चैन, अंगठी, मोटारसायकल, स्कूटी यासह गुन्ह्यात वापरलेला कोयता असा एकूण १ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. पान २ वर

## कृषी मुल्य आयोग झोपला आहे का?

### भाई गंगाभिषण थावरे यांचा सवाल

**माजलगाव दि.८ (प्रतिनिधी):– यावर्षी कापसाला योग्य भाव नाही व सोयाबीनलाही योग्य भाव नाही त्यामुळे शेतकरी त्रस्त आहे.कारण खताचे भाव वाढले, औषधाचे भाव वाढले, मजुरीचे भाव वाढले पण शेतीमालाला भाव नाही. आज कापुस वेचायला १० रुपये किलो द्यावा लागत आहे.त्यामुळे महागाई भरपुर वाढली असल्यामुळे कापसाला पण शेती मालास भाव नाही. यावर काम करणाऱ्या कृषी मूल्य आयोग झोपला आहे की काय असा सवाल भाई गंगाभीषण थावरे यांनी एका निवेदनाद्वारे शासनाकडे उपस्थित केला आहे.**

भाई गंगाभिषण थावरे यांनी शासनाला दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, कापसाला खाजगीमध्ये ७००० ते ७५०० मध्ये घेतला जातो आणि सरकारीमध्ये ८५०० रुपयाच्या आत भाव आहे. हा भाव काही शेतकऱ्यांना परवडत नाही यामुळे देशातला आणि महाराष्ट्रातला कृषीमुल्य आयोग झोपला आहे का?



असे दिसु येत आहे. सरकारचे प्रतिनिधी प्रत्येक भाषणात शेतकऱ्याचे नाव घेतो पण निवडणूक झाली की शेतकरी पुर्ण वाऱ्यावर सोडला जातो. एकीकडे शेतकऱ्याचे भले करतो म्हणायचं, शेतकऱ्यांच्या पाठीमागे सरकार उभे राहणार, आणखी शेतकऱ्याचे अतिवृष्टीच्या पान २ वर

## काठोडा-वांगी रस्त्यासाठी हरिभाऊ शेळके यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन

बीड दि.८ (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील ढेकणमोहा पंचायत समिती गणामधील प्ररामा



१६ जवळ काठोडा-वांगी रस्ता १/९०० कि.मी. ते ८/६०० कि.मी.चे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत ग्रामीण रस्ते विकास यंत्रणेमार्फत करण्यात आले आहे. या कामाचा दुरुस्ती कालावधी होऊन गेला तरी हा रस्ता वाहतुकीसाठी खुला नाही व योग्यही नाही. तरी या रस्त्याचे ज्या कंत्राटदाराने काम केले आहे त्या कंत्राटदारास डीएलपी अंतर्गत सदरील काम तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत यासाठी दि.८ डिसेंबर २०२५ रोजी राजुरी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. पान २ वर




## शेकोट्या पेटल्या

बीड दि.८ (प्रतिनिधी):- राज्यभरात थंडीची लाट आहे. बीड जिल्ह्यात तर असह्य थंडी पडली आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी ठिकठिकाणी नागरीक शेकोट्यांचा शेक घेतांना दिसततात.

पाहिजेत
माजलगाव तालुक्यातील केसापुरी येथील एल. बी.डक पेट्रोलियम येथे खालील पदे भरणे आहेत

| | |
|---|---|
| मॅनेजर | - 2 |
| डी. एस. एम. | - 5 |
| एअर बॉय | - 1 |
| फोरकॉट | - 1 |

हे सर्व पदे अर्जंट भरती करण्यात येतील, अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
:: संपर्क ::
7030004924
9975351955

## लाडक्या बहिणींना आता दोन महिन्याचे मिळून ३००० रुपये मिळणार

मुंबई दि.८ (प्रतिनिधी):- राज्यामध्ये महायुती सरकार पुन्हा एकदा स्थापन होऊन वर्षपूर्ती झाली. महायुतीकडून पुन्हा एकदा सरकार स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात आला. महायुतीचा प्रचार हा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला केंद्रस्थानी ठेऊन होता. प्रचारावेळी प्रत्येक महिलेला दरमहिन्याला ३ हजार रुपये दिले जातील असा दावा केला जात होता. मात्र प्रत्यक्षात सरकार आल्यानंतर एक वर्ष होऊनही ही रक्कम वाढवण्यात आलेली नाही. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी वक्तव्य केले.

महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वपूर्ण वक्तव्य केले आहे. यंदाच्या महिन्यामध्ये महिलांच्या पान २ वर

## ज्ञानराधाच्या अवसायकांनी वसुल केलेली कर्ज रक्कम ठेवीदारांना वाटप करावी

### – शिष्टमंडळाचे प्रशासनाला निवेदन–

बीड दि.८ (प्रतिनिधी):- ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या अवसायकांनी नियुक्त झाल्यापासून अद्याप कोणत्याही



प्रकारची ठेव परत केलेली नाही. त्यामुळे ठेवीदारांमधून रोष व्यक्त होऊ लागला असून अवसायकांनी वसुल केलेली कर्ज रक्कम ठेवीदारांना वाटप करावी अशी मागणी ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने प्रशासनाकडे केली आहे.

बीड येथील ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, सहकार आयुक्त, अवसायक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ज्ञानराधा मल्टीस्टेटने १५५ कोटी रुपयांचे कर्जवाटप केलेले आहे. सुवर्ण कर्ज हे ५ कोटी रुपयांचे वाटप झाल्याचे अवसायकांनी एका मुलाखतीत म्हटलेले आहे. त्यापैकी ५ कोटींचे सुवर्ण कर्ज हे सहज वसुल होईल असेही त्यांनी सांगितले होते. ज्यावेळी ज्ञानराधा मल्टीस्टेटने पान २ वर

CMYK

# प्रामाणिकतेणे,निर्भयपणे जगणे इतके कठीण आहे का?

जेव्हा एखादी व्यक्ती भ्रष्टाचारात गुंतते तेव्हा ते केवळ स्वतःच्या स्वार्थासाठीच काम करत नाही तर इतरांचे हक्कही वाईट मार्गाने हिरावून घेतो. ते देशाच्या विकासात आणि सुव्यवस्थेत अडथळे निर्माण करते, समाजात गुन्हेगारीची बीजे पेरते आणि अन्याय करून पीडितांच्या स्वप्नांना चिरडते, याचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. भ्रष्टाचारामुळे अनेकदा संपूर्ण समाजाला दशके त्रास सहन करावा लागतो. भ्रष्टाचारामुळे असंख्य निष्पाप लोकांचे जीवन उद्ध्वस्त होते आणि जीवनातील संघर्षाचे चक्र अधिक तीव्र होते.

सर्व नागरिकांना विकासाची संधी मिळते, सरकार समाजातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करते. कायदा आणि सुव्यवस्था हे त्याचे मजबूत आधारस्तंभ आहेत. नागरिकांचे हक्क, सरकारी कामे योग्यरित्या अंमलात आणून आणि प्रत्येक स्तरावर विविध उपक्रमांच्या कार्यक्षम अंमलबजावणीद्वारे शासन दररोज विकासाची कहाणी लिहितात. जर या सुशासनातील एकाही कडीने आपली जबाबदारी टाळली आणि स्वतःच्या स्वार्थासाठी काम करायला सुरुवात केली, तर ते अनेक संबंधित विभागांसाठी व्रण बनते आणि हळूहळू संपूर्ण विभाग पोकळ करते. बातम्यांमधून अनेकदा असे उघड होते की अनेक सामान्य सरकारी कर्मचारी आणि राजकारणी थोड्या वेळातच अब्जावधी रुपयांची संपत्तीचे मालक बनले आहेत. असा भ्रष्ट सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी समाजाचा, सरकारचा, देशाचा आणि संपूर्ण मानवतेचा शत्रू असतो.

आधुनिकतेचा अभिमान बाळगणारे, आपले समाज आणि आपण हीन विचारसरणी असलेले लोक, कोणत्या पातळीवर विश्वासार्हतेला पोहोचलो आहोत? मौलिकता, नैतिकता, सहजता, जागरूकता, नीतिमत्ता, निस्वार्थीपणा, परोपकार, सुसंस्कृतपणा आणि प्रामाणिकपणा बाजूला ठेवून, लोक वेगाने वाईट, कपट आणि स्वार्थी प्रवृत्ती स्वीकारत आहेत. लोकांची विचारसरणी अशी बनली आहे की जेव्हा एखादा अन्याय्य कृत्य किंवा गुन्हा घडतो तेव्हाही लोक गुन्हेगाराची बाजू घेण्यास तयार असतात. काही दिवसांपूर्वी मी एका व्यक्तीला भेटलो, त्या व्यक्तीने मला पैशाबद्दल स्वतःचे विचार सांगितले, ते म्हणाले की पैसा हा देव आहे, पैसाच सर्वस्व आहे, तो कोणत्याही स्त्रोतातून आला तरी, पैसा आदर, प्रसिद्धी, नाव आणतो, त्या द्वारे आपण सगळं काही विकत घेऊ शकतो, प्रत्येकजण स्वतःच्या स्वार्थासाठी जगतो, मग आपण प्रामाणिक का असायला हवं? आपण पैसे कसे कमवले हे कोणी विचारत नाही. पैशासाठी गुन्हे करा, तुरुंगात जा, शिक्षा भोगा. पण एकदा पैसे मिळाले की लोक आपले गुन्हे देखील विसरतात, त्यांना फक्त आपला पैसा दिसतो. लोकांच्या अशा निकृष्ट दर्जाच्या वाईट विचारसरणीमुळे देशातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडून गुन्हेगारीकरणाला थेट चालना मिळेल, अशा परिस्थितीत सर्वत्र जंगलराज स्थापित होईल.



आज देशात या घाण विचारसरणीच्या लोकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. आपण अनेकदा पाहतो की निवडणुकीत जनता गंभीर गुन्ह्यांसाठी दोषी उमेदवारांना निवडून देते. दुसरीकडे, उच्च शिक्षित, निष्पाप आणि प्रामाणिक सामाजिक कार्यकर्त्यांची अनामत रक्कम सुद्धा जप्त होते.

आपल्या आजूबाजूला खूप समस्या आहेत, आपल्याला अनेकदा भ्रष्टाचार आणि अनियमितता दिसते, बहुतेक लोक वाईटाविरुद्ध आवाज उठवणे टाळतात. सरकारी अधिकारी आणि कँत्राटदारांच्या बेजबाबदार कृतींमुळे अनेकदा अपघात होतात, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी देखील होते. दरवर्षी आपण पाहतो की पहिल्या पावसात रस्ते सरकारी दावे उघड करतात. अब्जावधी रुपये खर्चाचे प्रकल्प काही वेळातच बंद पडतात, काम निर्धारित वेळेत पूर्ण होत नाही आणि प्रकल्पाचे बजेट वाढत जाते. देशातील आर्थिक विषमता सतत वाढत आहे. स्वतःच्या फायद्यासाठी पक्ष बदलणारे राजकीय नेते इतरांना दोष देतात. सरकारकडून एकही महत्त्वाचा निर्णय घेण्यास उशीर केल्याने अनेकदा निष्पाप लोकांचे प्राण जातात, जरी मृत्यूनंतर मृताच्या कुटुंबाला काही आर्थिक मदत दिली जाते, परंतु मृताचे जीवन तर परत येत नाही. आपल्या देशात आत्महत्या करणाऱ्या गरीब शेतकऱ्यांची संख्या इतर कोणत्याही देशात होणाऱ्या आत्महत्यांपेक्षा जास्त आहे; त्या तुलनेत, इतर कोणताही व्यावसायिक इतक्या मोठ्या संख्येने आत्महत्या करत नाही. नेत्यांची नावे कितीही घोटाळे किंवा गुन्हेगारी कारवायांमध्ये असली तरी, नेते इतके तणावात राहत नाहीत की त्यांना आत्महत्या करावी लागते.

प्रामाणिक व्यक्तीने नकळत केलेली छोटीशी चूक देखील त्याला खोलवर पश्चात्तापाने भरून देते, पण अन्यायाने फायदे मिळवणारे भ्रष्ट लोक शांततेत कसे जगतात? ते कसे स्वाभिमानाने राहतात? ते त्यांच्या कुटुंबासाठी, नातेसंबंधांसाठी आणि प्रियजनांसाठी कसे आदर्श मांडतात? वस्तू, सेवा आणि नातेसंबंधांमध्ये सुद्धा आता भेसळ दिसून येते. आपला कोण विश्वासघात करेल हे आपण कधीच सांगू शकत नाही. स्वाभिमान, मानवता, प्रामाणिकपणा, कर्तव्य, सामाजिक जबाबदारी आणि नैतिकता यांचे काहीच मूल्य राहिले नाही का? आपण इतरांना दुखवून आनंद विकत घेऊ शकत नाही. जीवनात निरागस आनंद, निस्वार्थ प्रेम, मानसिक शांती, शांत झोप आणि समाधानी मन यापेक्षा जास्त कशाचीही गरज नाही; हेच खरे सुख आहे, जे आपल्याला आपल्या आचरणातून मिळते. वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांवर दररोज भ्रष्टाचाराच्या बातम्यांचा वर्षाव होतो. आपण सर्वांनी आपल्या आयुष्यात कधी ना कधी भ्रष्टाचाराचा सामना केला आहे. भ्रष्टाचारात संपूर्ण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याची ताकद असते. जर भ्रष्टाचाराला सत्तेची ताकद मिळाली तर अशा देशाला विनाशापासून कोणीही वाचवू शकत नाही.

लोकांनी जागरूक व्हावे, हक्क आणि कर्तव्ये समजून घ्यावीत. आपण माणूस म्हणून जन्मलो, तर मानवतेप्रती असलेले आपले कर्तव्य प्रत्येकाने

**आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन विशेष**
**९ डिसेंबर २०२५**

पाडायलाच हवे. एखाद्याने इतरांचे हक्क हिसकावून न घेता प्रामाणिक व्यक्तीची भूमिका बजावली पाहिजे. एखाद्या व्यक्तीकडे जितके उच्च जबाबदारीचे पद असेल तितकेच तो जनतेला उत्तर देण्यास जास्त जबाबदार असतो. जनतेने त्याला घाबरू नये, पण जर त्याने काही चूक केली तर त्याला जनतेची भीती वाटली पाहिजे. जनता आपल्या करांद्वारे सरकारला आर्थिक बळ देते, जबाबदार अधिकारी किंवा नेत्यांकडून उत्तरे मागण्याचा पूर्ण अधिकार जनतेला आहे. गुन्हेगार आणि चुकीचे काम करणाऱ्या लोकांनी भीतीने जगावे, सुसंस्कृत आणि प्रामाणिक लोकांनी नाही. भ्रष्टाचार करणारी व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी फायदे शोधते, पण फायदे देणारी व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देते. जर फायदे देणे बंद झाले तर भ्रष्ट माणूस फायदे मागणार कोणाला? भ्रष्टाचारमुक्त वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने स्वतः घेतली पाहिजे. आपल्या देशासाठी आपल्याला काही त्रास सहन करावा लागला तरी चालेल. पण भ्रष्टाचार मुक्त वातावरण आपल्या देशाचे भविष्य उज्वल करेल आणि भावी पिढ्यांना त्यांचे हक्क मिळतील. राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक पातळीवरील भ्रष्टाचार विरोधी संस्था, शासकीय विभाग जनतेला मदत करण्यासाठी उपलब्ध आहेत. त्यांची मदत घ्या. आपण शासनाच्या हेल्पलाइन नंबर, ईमेल पत्ते आणि वेबसाइट्सद्वारे त्यांच्याशी ऑनलाइन संपर्क साधू शकतो. लाच देऊ नका किंवा घेवू नका, सतर्क रहा. राष्ट्रीय हितासाठी सहकार्य करा.

डॉ.प्रीतम भी. गेडाम
मोबाईल/व्हॉट्सप क्रमांक
०८२३७४१७०४१

## ८ वीच्या विद्यार्थ्याला चोर या विषयावर निबंध लिहायला सांगितले होते

### तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल,पण त्याने लिहिलेला निबंध असा होता

**चोर** हे देखील देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते रोजगारनिर्मिती आणि देशाच्या विकासात आपले मोठे योगदान देतात. सेफ, कुलुपे, लॉकर, कपाटे इत्यादी वस्तू फक्त चोरांमुळेच तयार केल्या जातात. या वस्तू बनवणाऱ्या अनेक कारखान्यांना आणि कामगारांना चोरांमुळे रोजगार मिळतो. घरांमध्ये कुलपे, ग्रील्स, दरवाजे आणि खिडक्यांवर लॅच बसवण्यासाठी मिस्त्री आणि कामगारांना काम मिळते. घर, दुकान, शाळा, कॉलेज, ऑफिस आणि कारखाने चोरांपासून वाचवण्यासाठी सुरक्षा रक्षक आणि वॉचमन आवश्यक असतात. सीसी टीव्ही कॅमेरे, मेटल डिटेक्टर, सुरक्षा यंत्रणा बनवणाऱ्या कँपन्यांना देखील रोजगार मिळतो. चोरांमुळे पोलीस अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी, न्यायाधीश, वकील यांनाही काम मिळते. पोलीस दलासाठी लागणारी बॅरिकेड्स, शस्त्रे, गोळ्या, दंडुके, गणवेश, वाहने इत्यादी खरेदीमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळते. चोरांमुळे तुरुंग, जेलर आणि तुरुंगातील कर्मचारी यांनाही रोजगार मिळतो. मोबाईल, लॅपटॉप, कार, मोटरसायकल, घरगुती वस्तू, पर्स किंवा लिपस्टिक चोरी गेल्यानंतर लोकांना



त्या पुन्हा खरेदी कराव्या लागतात त्यामुळे व्यापार वाढतो. आणि प्रसिद्ध तसेच नामांकित चोर राजकारणात प्रवेश करून आणखी मोठ्या चोरीला हात घालतात. एकूणच पाहता, देशाच्या अर्थव्यवस्थेत चोरांचे योगदानही कमी नाही! शिक्षकांनी या संशोधनसमृद्ध निबंधाला १००% गुण देऊन त्या विद्यार्थ्याला मेरिट लिस्टमध्ये स्थान दिले. दृष्टिकोन महत्त्वाचा असतो!

## पान १ वरुन

### धनंजय मुंडे मुख्यमंत्र्यांना भेटले

विचार पत्रकारांनीच करायला हवा, असेही धनंजय मुंडे यांनी सांगितले.

### एमपीएससीचा पेपर पुढे ढकलला

निवडणुकीची मतमोजणी होणार असल्यामुळे जिल्हाधिकारी व इतर अधिकारी या मतमोजणीत व्यस्त राहणार आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सोमवारी एका परिपत्रकाद्वारे ही परीक्षा पुढे ढकलण्याची घोषणा केली. त्यामुळे आता २१ डिसेंबर रोजी होणारी परीक्षा ४ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

### अतिक्रमणधारकांना सीओंची तंबी...

असलेल्या या रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने सोमवारी दुपारी चार वाजता थेट सीओ शैलेश फडसे हे स्पॉटवर पोहचले. या भागात येवून त्यांनी पाहणी केली. आणि जर दहशत निर्माण करून हा रस्ता बंद करण्याचा प्रयत्न कोणी करत असेल तर त्यावर थेट गुन्हा दाखल करण्याचे आदेशही यावेळी त्यांनी दिले. एवढेच नव्हे तर या रस्त्यावर उभारलेले सिमेंटचे पोल, पाट्या आणि झेंडेही हटविण्यात आले आहेत. दरम्यान सीओंच्या या कारवाईचे येथील नागरिकातून समाधान व्यक्त केले जात आहे.

### बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास नोकरी

प्रस्तावावर गंभीरपणे विचार सुरू आहे. कुटुंबातील कर्ती माणसे गेल्याने आर्थिक वाताहत, मुलांचे शिक्षण, घरखर्च, शेती, कर्ज या जबाबदाऱ्यांची ओझी होतात. त्यामुळे संबंधित कुटुंबावर आलेला आर्थिक भर लक्षात घेता सरकार लवकरच या संदर्भात सकारात्मक निर्णय घेऊ शकते अशी माहिती वन विभागातील सूत्रांनी दिली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध जिल्ह्यांत बिबट्या आणि वाघांच्या हालचाली वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी जनावरांवर हल्ले, तर काही प्रसंगी मानवांवरही हल्ले होऊन झाले आहेत. परिणामी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर शासकीय नोकरीसंदर्भातला प्रस्ताव विचाराधीन असून लवकरच यासंदर्भात निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### कृषी मुल्य आयोग झोपला आहे का?

अनुदानाचे पैसे मिळाले नाही.या सर्व गोष्टीतुन असे दिसुन येते की, सरकार हे शेतकऱ्यांविरुध्द आहे, असा आरोप ही या निवेदनात करण्यात आला आहे. कृषीमुल्य आयोग हे बुजवण आहे का? असा सवाल शेतकरी करत आहे. म्हणुन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत आम्ही. कृषीमुल्य आयोगाला जिल्हाधिकारी यांनी आमचे म्हणने मांडावे की, कृषीमुल्य आयोग शेतकऱ्याच्या जनावराच्या चाऱ्यापासुन, बैलाच्या किंमती पासुन,खत, औषधे,मजुरी, त्याचे घरातील मानसे शेतात राबतात या सगळ्याचे मुल्य काढुन कृषी मुल्य आयोग हे भाव ठरवत असत.पण सध्या कृषीमुल्य आयोगाला झोप लागली का ? असा सवाल शेतकरी करत आहे. म्हणुन कृषीमुल्य आयोगाने शेतकऱ्याच्या आजच्या घडीच्या सर्व खर्चावर भाव जाहीर करावे नसता शेतकरी कृषीमुल्य आयोगाच्या दारात सर्व शेतकऱ्यांना घेऊन आंदोलन करण्यात येईल असा इशारा भाई गंगाभिषण थावरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.तत्पुर्वि दि.११ डिसेंबर गुरुवार रोजी तेलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कापसाची होळी व सोयाबीन रस्त्यावर फेकून शासनाचा निषेध करण्यात येणार असल्याचेही भाई गंगाभिषण थावरे यांनी यावेळी सांगितले.

### लाडक्या बहिणींना दोन महिन्याचे ३ हजार

खात्यामध्ये तीन हजार रुपये जमा होणार असल्याची आनंदाची बातमी आदिती तटकरे दिली आहे. यंदा पात्र लाडक्या बहिणींच्या खात्यात एक सोडून दोन हप्ते जमा होतील. त्यांच्या बँक खात्यात नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन्ही महिन्याचे पैसे जमा होतील. बँक खात्यात १५०० रुपये नाही तर ३००० रुपये जमा होतील. यामुळे लाडक्या बहिणींमध्ये एकच उत्साह निर्माण झाला आहे.

डिसेंबर महिन्याची सुरुवात झाली आहे. मात्र लाडक्या बहिणींना अद्याप नोव्हेंबर महिन्याचा हप्ता मिळालेला नाही. माध्यमातील काही वृत्तानुसार, यावेळी नोव्हेंबर आणि डिसेबर महिन्याचे दोन्ही हप्ते बँक खात्यात जमा होणार आहे. असे झाले तर लाडक्या बहिणींच्या खात्यात सरकार ३००० रुपये जमा करेल. अनेकांना नोव्हेंबर महिन्याचा हप्ता का जमा करण्यात आला नाही याबाबत संशय निर्माण झाला आहे. मात्र या सर्व महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचा हप्ता जमा होईल असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

### ज्ञानराधाच्या अवसायकांनी वसुल केलेली कर्ज रक्कम ठेवीदारांना वाटप करावी...

सुवर्ण कर्ज वाटप केले त्यावेळी सोन्याचा भाव ६० हजार रुपये प्रति १० ग्रॅम या प्रमाणात होता व १० ग्रॅम सोन्याच्या ६० टक्क्यापर्यंत म्हणजेच १ तोळा सोन्यावर सोसायटीने ३६ ते ४० हजार रुपये कर्ज लोकांना दिलेले होते. आजची परिस्थिती पाहता सोन्याचे भाव हे जवळपास १ लाख ३० हजार रुपये प्रति १० ग्रॅम गेल्यामुळे ज्या ज्या लोकांचे सुवर्ण या पतसंस्थेत अडकले होते त्यांनी त्या कर्जाची रक्कम भरुन व कर्जावरील व्याजाची रक्कम भरुन आपले सोने सोडवून घेतलेले आहे. त्याच बरोबर ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणात ईडी, सीआयडी, आर्थिक गुन्हे शाखा अशा मोठमोठ्या तपास यंत्रणेकडून चौकशी सुरु असल्यामुळे अनेक कर्जदारांनी आपल्याकडे असणारे कर्ज ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या अवसायकांकडे भरलेले आहे. कर्ज वसुलीची रक्कम अवसायकांच्या खात्यावर जमा झालेली आहे. अशा प्रकारे जमा झालेली कर्ज वसुलीची रक्कम त्वरीत ठेवीदारांमध्ये वाटप करावी अशी मागणी ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने प्रशासनाकडे केली आहे. निवेदनावर नीलेश सांगळे, सुरेश कासट, महेश लोहिया, रमेश फटाले, शेख आर.आय., बांगर आर.एच., पालवे टी.जी. आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### काठोडा-वांगी रस्त्यासाठी आंदोलन

या बाबत संबंधीत कार्यालयास २७नोव्हेंबर २०२५ रोजी अर्ज देण्यात आलेला होता, परंतु त्याची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे हे हरिभाऊ शेळके यांच्या नेतृत्वाखाली राजुरी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

### बाबा आढाव यांचं निधन...

बाबा आढाव यांचा जन्म १ जून १९३० रोजी पुण्यात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण महापालिका शाळेत तर, शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण झाले. रसायनशास्त्राची पदवी संपादन करून त्यांनी ताराचंद रामनाथ आयुर्वेद महाविद्यालयातून १९५२ मध्ये पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी नाना पेठेतील घरी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. भाऊसाहेब रानडे, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, आणि राम मनोहर लोहिया यांच्या समाजवादी सिद्धांतांनी बाबा प्रेरित झाले. राष्ट्र सेवा दलात भाई वैद्य, पन्नालाल सुराणा, बापूसाहेब काळदाते यांच्यासह इतर समाजवादी नेत्यांसोबत त्यांनी काम केले.

परिचारिका म्हणून काम करणाऱ्या शीला गरुड यांच्याशी १९६६ मध्ये बाबा विवाहबद्ध झाले. राज्यातील दुष्काळादरम्यान हमालांच्या हलाखीच्या परिस्थितीने व्यथित झालेल्या बाबांनी महागाई आणि अन्नधान्याच्या रेशनिंगविरुद्ध सत्याग्रह केला. त्यांनी तीन आठवडे तुरुंगवास भोगला आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी वैद्यकीय व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेतला. हमालांना संघटित करण्याच्या प्रयत्नांतून हमाल पंचायत ही असंघटित कामगारांची पहिली संघटना त्यांनी स्थापना केली.

नागरी संघटनेच्या माध्यमातून भवानी पेठेतून नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर वंचितांसाठी काम करून बाबांनी झोपडपट्टीवासीयांचे विविध प्रश्न मार्गी लावले. खेड लोकसभेची निवडणूक लढविल्यानंतर मात्र सक्रिय राजकारणापासून दूर होऊन त्यांनी सामाजिक क्षेत्रात काम करण्यात जीवन व्यतीत केले.

### डोळ्यात चटणी टाकून लुटणारी टोळी गजाआड

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या महामार्गावर वाहने अडवून लूटमार करण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षकांनी अशा गुन्ह्यांचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे दिलेला आहे. अशा प्रकरणात तातडीने तपास करुन आरोपींना अटक करा अशा सूचना पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमने एका टोळीला गजाआड केले आहे. दि.५ डिसेंबर २०२५ रोजी अरुणोदय मार्केटमधील बॉस फिटनेस येथे व्यायाम करुन एक इसम धारावती तांडा येथे मोटारसायकलवरुन जात असतांना काळरात्री देवी मंदिर रोडने पुढे गेल्यावर सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास पाठिमागून आलेल्या दोन इसमांनी मोटारसायकल आडवी लावून त्या इसमाला थांबविले. दोघांनी त्याला चाकुचा धाक दाखवून त्याच्या डोळ्यात चटणी टाकून सोन्याची चैन, अंगठ्या जबरीने चोरुन नेल्याची घटना घडली होती. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हा शाखेने तपास सुरु केला. दि.८ डिसेंबर रोजी सदरील गुन्ह्याचा तपास करत असतांना पंकज तुकाराम उगलमुगले (वय २५) रा.पाडळी ता.शिरुर कासार, ह.मु.पांगरी ता.परळी, वैभव राम बीडगर (वय २०), रा.दाऊतपूर, ता.परळी, शामसुंदर बालासाहेब फड (वय २०), मरळवाडी ता.परळी, आदित्य सुरेश उफाडे (वय २०), रा.सिद्धार्थ नगर परळी या चौघांनी हा गुन्हा केल्याची माहिती समोर आली. पो.उप.नि. सुशांत सुतळे व पथकाने तात्काळ सदरील इसमांना शिताफीने पकडून त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. यावेळी पोलिसांनी चैन, अंगठी, मोटारसायकल, स्कुटी व एक कोयता असा मुद्देमाल जप्त केला. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा.चे पोलीस शिवाजी बंटेवाड, पो.उप.नि.सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारुती कांबळे, रामचंद्र केकाण, विष्णू सानप, गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, चालक पो.ह. अतुल हराळे यांनी केली.

## पान ६ वरुन

### धुनकवड पंचायत समिती गणात

आधार देण्याचे तसेच शासकीय कार्यालयातील लोकांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देण्याचे कार्य केले आहे तसेच त्यांनी आतापर्यंत भाजपचे आणि नामदार पंकजा ताई मुंडे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणूनच काम केले आहे धुनकवड पंचायत समिती गणात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे त्यामुळे भाजपने रामलिंग मुंडे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष उच्चशिक्षित सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या प्रामाणिक कार्य करणाऱ्या युवकास संधी द्यावी अशी मागणी धुनकवड पंचायत समिती गणातील सर्वसामान्य जनतेची आहे.

### नवगण महाविद्यालयात संत जगनाडे महाराज

त्यांनी सांगितले की, आजच्या पिढीने संतांच्या शिकवणींमधून सामाजिक बांधिलकीची प्रेरणा घ्यावी.राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बबन मोहिते यांनी विद्यार्थ्यांना समतेचे तत्त्व, श्रमाची प्रतिष्ठा आणि समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी एनएसएसच्या माध्यमातून समाजोन्नतीसाठी विविध उपक्रम राबवण्याचे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागातील कर्मचारी तसेच इतर अध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी अभंग, विचार आणि वाचनांद्वारे संतांची शिकवण जिवंत केली.कार्यक्रमाचे समन्वयन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने केले. शेवटी सर्वांचे आभार एनएसएस स्वयंसेवकांनी मानले.

### तहसिलदार शेळके यांच्या मध्यस्थीने

व या भागातील सर्व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसीलदार शेळके यांनी या रस्त्याच्या दोन्ही बाजूने असणाऱ्या शेतकऱ्याचे सहकार्य केल्याबद्दल आभार मानले. देवी बाभळगाव ग्रामस्थ व शेतकरी यांच्या वतीने शेळके साहेब यांनी स्वतः लक्ष घालून सहकार्य केल्याबद्दल आभार मानले. यावेळी तहसीलदार साहेब, तलाठी साहेब, यांनी पावसाळ्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाईच्या अनुदानासाठी येणाऱ्या अडथळा संबंधात मार्गदर्शन करून सर्वांनी केवायसी करून किंवा आधार अपडेट करून घेऊन आपले अनुदान प्राप्त करून घेण्याचे आवाहन केले. तरी काही अडचण आल्यास स्थानिक महसूल कर्मचारी यांना किंवा माझ्याकडे आले तरी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

### वा..रे...बीड नगरपालिका बलभीम कॉलेज परिसरात

शक्यता बळावली आहे. या संदर्भात महाविद्यालयीन विद्यार्थी वर्गातून बीड नगर परिषदेच्या निष्क्रियतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. नगर परिषदेच्या आशीर्वादानेच ही परिस्थिती निर्माण झाली आहे, असे मत अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. नगर परिषदेने याकडे तातडीने लक्ष देऊन महाविद्यालयाच्या परिसरातील कचरा त्वरित उचलून परिसर स्वच्छ करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### अंबाजोगाईतील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

शहरामध्ये शेकडोंच्या संख्येत मोकाट कुत्रे रस्त्याने फिरत आहेत. सकाळी फिरायला जाणाऱ्या लोकांना, ज्येष्ठ नागरिक व शाळेत, शिकवणीसाठी जाणाऱ्या लहान मुलांच्या जीवितास यामुळे धोका निर्माण झाला आहे. असे असताना ही नगरपरिषद अंबाजोगाई यांनी सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सदर मोकाट कुत्र्यांची व्यवस्था करणे आवश्यक होते. परंतु, समाजवादी पार्टीच्या वतीने यापुर्वीही निवेदन देऊन सुद्धा अद्यापपर्यंत नगरपरिषद, अंबाजोगाई यांनी मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यामुळे क्रांतीनगर भागामध्ये एका ८ वर्षाच्या मुलीवर हल्ला करून तिला गंभीर जखमी केले आहे. अशा पद्धतीच्या घटना यापुढे घडू नये म्हणून तात्काळ आपण उपाययोजना कराव्यात अन्यथा नगरपरिषद प्रशासनाविरोधात समाजवादी पार्टीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल. याची नोंद घ्यावी असा इशारा समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे आणि अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी प्रशासनाला दिला आहे. निवेदन देताना समाजवादी पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### ग्रामरोजगार सेवकास जिवे मारण्याचा प्रयत्न

घरातून बाहेर ओढून तु लय माजलास , तुला आम्ही सोडणार नाहीत, जिवे मारून टाकूत, तुझ्या कुटूबाला गावात राहू देणार नाहीत अशा धमक्या देत जातिवाचक शिविगाळ करत दुचाकीला बांधून गावातील चौकात ओढत नेहून लाथाबुक्यानी आणि लोंखडी रॉड , काट्यांनी मारहाण केली याबाबत तलवाडा पोलीस स्टेशन येथे जालिंदर सुरवसे याची बहिण उषा सांळूके आणि आई ह्या दोघी मारहाण केल्यांनंतर पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेल्या असता त्यांना पोलिसांनी राजकिय दबावा पोटी दाबदडप करून पोलिस स्टेशनच्या बाहेर काढले.तरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या प्रकरणात लक्ष घालून संबधित लोकांवर कारवाई करून संबंधित अदिवासी कुटूबाला न्याय देण्याची मागणी होत आहे.

### श्रीकांत नवले यांनी मोफत रुग्णवाहिका

रवींद्र शिंगारे पोलीस बॉईज संघटनाचे अध्यक्ष ,रामकिशन नारायण घुमरे, शिवाजी सरडे, लतीफ सय्यद ,व पारगाव शिरस येथील श्रीकांत (नाना ) युवा मंच व सर्व गावकरी उपस्थित होते.

### समाजसेवक आजीनाथ गवळी यांच्या स्नेहभेटीला पुणेकरांचा उदंड प्रतिसाद

उपअधिक्षक अविनाश पवार,युवाउद्योजक कुंडलीक सोनटक्के,युवाउद्योजक शंकरराव तांबे,बिभिषण कातखडे,श्रीमंतराव येवले,भगवान म.बारगजे,कमलाकर कासुळे,पत्रकार सतिष मुरकुटे,पत्रकार प्रकाश साळवे,पोपट दादा सुरे,दत्ता सावंत,गौतम नहार,खंडु कातखडे,संतोष नहार,दादासाहेब बनकर,गहिनाथ कातखडे,खंडु साळुंके,दस्तगीर सय्यद,गुलशन बनकर,नवनाथ बनकर,नानाभाऊ बनकर,ज्ञानेश्वर काकडे,विठ्ठल डोके,महेश कातखडे, सोमनाथ बनकर,किरण पाटील, संजय कातखडे,गोवर्धन बनकर,सुदाम बनकर,बंडु बनकर,रोहीदास बनकर,सागर विधाते,मधुकर बनकर,विलास रंधवे,आरुण गवळी,डॉ.निखिल साळवे,पांडुरंग बनकर,हानुमान काकडे,गणेश निंबाळकर,रमेश साळुंके,विकास दिवटे,श्रीम.नानुशा सोनवणे,श्रीम.संजीवणी डोंगरे,भिमाबाई कांबळे,राजेंद्र सुरे,भारत तावरे,गोकुळ शिंदे,लक्ष्मण सुरे,खंडु शिंदे,अमोल काकडे,किरण तांबे, अशोक सुरे,विशाल बनकर, स्वप्नील नरसाळे,नवनाथ निबाळकर,रामनाथ बडे,भागवत बारगजे,अवधुत तावरे,ब्रम्हदेव गर्जे,संजय पालवे,जालींदर ठाकर,विकास धनवे आदींची उपस्थिती होती.

### शिवसेना शिंदे गटाचे वांगे फाटा येथे आंदोलन

यानी मिळुन आज वारंवार प्रशासनाला रास्ता दुरुस्तीचे निवेदन देऊन ही दुर्लक्ष केले . हा रास्ता रहदारीचा असाल्याने दोन गावांना शहरांशी जोडणारा असल्याने या गावातील ग्रामस्थांनी आज युवा नेते हरिभाऊ शेळके यांच्या नेतृत्वात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.या आंदोलनाची दखल म्हणून प्रशासनाने लवकरात लवकर यावर कारवाही करून रस्ता दुरुस्त करून देण्याच्या आश्वासन लिखित स्वरूपात देण्यात आले आहे व या कारवाई न झाल्यास हरिभाऊ शेळके शिवसेनेचे नेते यांनी पुढील आंदोलन कलेक्टर ऑफिसवर कडक निदर्शने करण्यात येतील असा इशारा प्रशासनाला देण्यात आलेला आहे.

### प्रियंका व किरण यांचा विवाह सोहळा उत्साहीत वातावरणात संपन्न

दि.०५ डिसेंबर रोजी दुपारी संत सेना महाराज मंदिर बाजार तळ गेवराई याठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वधू - वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते. या दोघांचा लग्नसोहळा पाहुणे मंडळी व मित्र परिवाराच्या उपस्थितीत पार पडला. वधू - वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी राजकीय, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, सहकार, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### दिव्यांग शाळेसह दिव्यांगाच्या विविध मागण्यासाठी हिवाळी अधिवेशनावर

१३ सप्टेंबरचे जाचक परिपत्रक रद्द करा कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय द्या पुणे प्रादेशिक व लातूर प्रादेशिक उपाआयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता वितरणात घोटाळे केले या वर आयुक्त भूमिका घेत नाही परभणी च्या चारही कार्यशाळेत खुलेआम दिव्यांगाच्या नावाखाली घोटाळे सुरु आहेत या व इतर अनेक मागण्यासाठी ८ डिसेंबर रोजी नागपूर च्या हिवाळी अधिवेशनावर डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शेकडो पीडित कर्मचारी व कार्यकर्त्यांनी मोर्चा काढून दिव्यांग मंत्रालय व आयुक्तालया विरोधात संताप व्यक्त केला. मागण्याचे निवेदन सचिव तुकाराम मुंडे यांना देण्यात आले. मागण्या पूर्ण न केल्यास मंत्रालयावर पुन्हा बिराड मोर्चा काढण्याचाइशारा डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला या मोर्चात राज्यातून शेकडोजन उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक ९ डिसेंबर २०२५ पान –३


## शिवणी विद्यालयत विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा उत्साहात संपन्न

बीड दि ८ (प्रतिनिधी)- तालुक्यातीलशिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिवणी येथे लोकनेतेमाजी मंत्र जयदत्तजी (आण्णा) क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात दि.२ ते दि.०७ डिसेंबर२०२५ या कालावधीमध्ये निबंध स्पर्धा,प्रश्न मंजूषा स्पर्धा,सामान्यज्ञान स्पर्धा,कथाकथन स्पर्धा,हस्ताक्षर स्पर्धा,रांगोळी स्पर्धा व चित्रकला स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.विविध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला.

## सुभानपूर येथील नाम सप्ताहात उद्या ह भ प शिवदास महाराज जंगले शास्त्री यांचे कीर्तन

बीड दि ८ (प्रतिनिधी)- जालना जिल्ह्यातील व भोकरदन तालुक्यातील मौजे सुभानपूर येथे ६ डिसेंबर पासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद्? भागवत कथा होत असून यानिमित्त माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील विनोदाचार्य हवप शिवदास महाराज जंगले शास्त्री यांचे बुधवार दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी सुश्राव्य हरि कीर्तन आयोजित केले आहे. यात ६ डिसेंबर रोजी ह भ प ज्ञानेश्वर महाराज शासनकर, ७ डिसेंबर रोजी ह भ प कृष्णा महाराज मोकासे, ८ डिसेंबर रोजी ह भ प सागर महाराज काचोळे यांचे हरिकीर्तन झाले. तर मंगळवार ९ डिसेंबर रोजी हभप सुधाकर महाराज वाघ, बुधवार दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी हभप शिवदास महाराज जंगले शास्त्री यांचे कीर्तन होणार आहे. तर ११ डिसेंबर रोजी ह भ प जाणवी दिदी सोनवणे, १२ डिसेंबर रोजी हभप महादेव महाराज गिरी यांची कीर्तन सेवा होणार आहे. दरम्यान १३ डिसेंबर रोजी हभप शिवाजी महाराज तळेकर यांचे काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसादाने या नाम सप्ताहाची सांगता होणार आहे .

# शाळा बंद आंदोलनात सहभागी शिक्षकांचे १ दिवसाचे वेतन कापणार

मुंबई दि ८ (प्रतिनिधी) -राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षकांनी ५ डिसेंबरला राज्यव्यापी पुकारलेल्या शाळा बंद आंदोलनात सहभागी झालेल्या प्राथमिकच्या २१,४७७ आणि माध्यमिक शाळेतील २५३९ शाळेतील एकूण ९६ हजार ८०० शिक्षक शिक्षकांवर शालेय शिक्षण विभागाकडून एक दिवसाची वेतन कापण्याची कारवाई शालेय शिक्षण विभागाच्या शिक्षण निरीक्षक आणि शिक्षणाधिकारी कार्यालय स्तरावरून केली जाणार आहे.

१५ मार्च २०२४ चा सरकारचा निर्णय रद्द करावा आणि शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्यता केली जाऊ नये या प्रमुख मागणीसाठी राज्यातील विविध शिक्षक, मुख्याध्यापक आदी संघटनांकडून ५ डिसेंबर रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करण्यात आले. पण संस्थाचलकांनीच या आंदोलनात पाठ फिरवल्याने यामध्ये पुणे, नाशिक, कोल्हापूर आदी विभागाचा अपवाद वगळता राज्यातील अर्ध्याहून अधिक शाळांनी या बंदमध्ये सहभाग नोंदवला नाही. दरम्यान अहवाल केल्यानुसार यात माध्यमिकच्या २६,४९० शाळांपैकी केवळ २,५३९ शाळा बंद राहिल्या, तर या शाळांमध्ये कार्यरत असलेले २ लाख २४ हजार ३६६ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी केवळ १३, २१६ शिक्षकांनी शाळा बंद मध्ये सहभाग घेतल्याने राज्यातील माध्यमिकच्या शाळा प्रचंड मोठ्या प्रमाणात सुरू होत्या, असे चित्र विभागाच्या अहवालातून दिसून आले आहे.

शाळा बंदचा सर्वाधिक फटका प्राथमिकला शाळा बंदचा सर्वात मोठा प्रभाव प्राथमिकच्या अनुदानित शाळांमध्ये दिसून आला. राज्यात असलेल्या ५७ हजार १३ शाळांपैकी २१ हजार ४७७ शाळा पूर्णपणे बंद राहिल्या. तर उर्वरित तब्बल ३५ हजार ५३६ शाळा सुरू होत्या. शाळा बंद असलेल्या शाळातील ८३ हजार ५८४ शिक्षक आपल्या शाळांवर गैरहजर राहून शाळा बंद आंदोलनात सहभागी झाले होते. माध्यमिकच्या सर्वाधिक शाळा कोल्हापूर विभागात ८४८ शाळा बंद राहिल्या. यामध्ये एकट्या कोल्हापूर जिल्ह्यात ४६९ शाळा बंद होत्या.

# सहा फूट उंचीच्या जाळीवरून उडी घेऊन हिंस्त्र प्राण्याने पाडला तब्बल सात शेळ्यांचा फडशा

## रविवारच्या रात्री डोंगर पिंपळा येथे घडली घटना

अंबाजोगाई दि ८ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, शिरूर कासार या तालुक्यात बिबट्याने पाळीव प्राण्यावर सतत हल्ले चालवले. नव्हे तर महिलावर देखील हल्ला करून फडफडत ओढित नेण्याचा प्रकार नुकताच घडला. असे असताना अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर पिंपळा येथे तर भयानक घटना घडली. अज्ञात हिस्त्र प्राण्याने सहा फूट लोखंडी कंपाऊंडच्या आत असलेल्या शेड मधील शेळ्यावर केलेल्या हल्ल्यात तब्बल ७ शेळ्याचा मुडदा पाडला. अशी घटना रविवारच्या रात्री घडली .यामुळे संबंधित शेतकऱ्याचे १ लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान झाले असून, परिसरात प्रचंड दहशत पसरली आहे.

या संदर्भात माहिती अशी की, डोंगर पिंपळा येथील शेतकरी बळीराम बाबुराव केंद्रे हे ज्या शेतात वहीती करतात, तिथेच त्यांनी शेळी पालनासाठी शेड उभारले आहे. केंद्रे यांच्याकडे सह् मोठ्या शेळ्या आणि एक लहान पाट असे एकूण ७ पशुधन होते. रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता त्यांनी शेळ्यांना चारापाणी केले आणि ते झोपण्यासाठी गेले. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात हिंस्त्र श्वापदाने त्यांच्या शेडवर हल्ला केला. या हिस्त्र श्वापदाने शेडच्या संरक्षणासाठी लावलेल्या सहा फूट उंचीच्या जाळीवरून सहज उडी मारून आत प्रवेश केला. आत शिरताच त्याने ७ ही शेळ्यांना ठार मारून त्यांचा फडशा पाडला. सोमवारी पहाटे ५ वाजता सुमारास ही घटना उघडकीस आल्यानंतर बळीराम केंद्रे यांना धक्का बसला. यामध्ये त्यांचे सुमारे १ लाखांहून अधिक रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाने येवून पंचनामा केला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रतन तळेकर आणि डॉ. अभिषेक अबुज यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृत शेळ्यांचे शवविच्छेदन केले. या घटनेमुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये मोठी भीतीचे वातावरण आहे. वनविभागाने तातडीने या हिस्त्र श्वापदाचा शोध घेऊन बंदोबस्त करावा, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी डोंगर पिंपळा येथील



ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान बीड जिल्ह्यामध्ये हे सर्व प्राण्यांनी धुमाकूळ घातला आहे विशेष करून आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यात बिबट्यासारख्या प्राण्याने नागरिकांना एकटेच दुकटे शेतात काम करणे मुश्किल केले आहे. अंबाजोगाई तालुक्यात देखील बिबट्या पाहिल्याचे अनेकदा नागरिकांनी सांगितले नव्हे तर बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव प्राणी मारल्याच्या अनेकदा घटना घडल्या. परंतु डोंगर पिंपळा येथील या घटनेने रात्रीच्या वेळी शेळ्या मेंढ्या अथवा आपले पशुधन सांभाळणे धोक्याचे ठरले असल्याची प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून व्यक्त केल्या जात आहे. वन खात्याने याबाबत त्वरित कारवाई करून या शेतकऱ्याला नुकसान भरपाई द्यावी असे मागणी देखील होत आहे.

# राज्यस्तरीय सिनिअर तायक्कांदो स्पर्धेत कु.नयन बारगजेला १० वे सुवर्णपदक

### हैदराबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय वरिष्ठ गट तायक्कांदो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड



बीड दि ८ (प्रतिनिधी)-- लातूर येथे पार पडलेल्या ३५ व्या महाराष्ट्र राज्य सिनियर क्योरोगी तायक्कांदो स्पर्धेत कु. नयन अविनाश बारगजे हीने पुन्हा एकदा सुवर्णपदक मिळवून हैदराबाद ( तेलंगणा ) येथे होणाऱ्या राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघात स्थान मिळविले आहे. आतापर्यंतचे १० वे सुवर्णपदक आहे. अशी माहिती तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई ) संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली.

तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई संघटनेच्या मान्यतेने लातूर जिल्हा क्रीडा संकुलात दिनांक५ ते ७ डिसेंबर २०२५ दरम्यान पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य सिनियर क्योरोगी व पुमसे तायक्कांदो स्पर्धेत पुणे, ठाणे , जळगाव, रायगड, रत्नागिरी व बीड जिल्ह्यातील खेळाडूंचे वर्चस्व राहिले. जवळपास २८ जिल्ह्यातील ३२० खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले. बीड जिल्ह्याची आंतरराष्ट्रीय खेळाडू कु. नयन अविनाश बारगजे हिने ४९ किलो वजन गटात अंतिम फेरीत धडक मारत पुन्हा एकदा सुवर्णपदक पटकावले. तीचे राज्यस्तरावर हे १० ने सुवर्णपदक व अजिंक्यपद आहे. हैदराबाद (तेलंगणा) येथे दिनांक १२ ते १५ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या ४१ वी राष्ट्रीय सिनियर क्योरोगी व पुमसे तायक्कांदो स्पर्धेसाठी तीची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. नयन बारगजे हिने आजवर राज्यस्तरीय स्पर्धेत १० वेळा सुवर्णपदक पटकावून देशपातळीवर महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करून १० वेळा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा , शालेय स्पर्धा, फेडरेशन, ओपन स्पर्धा व अखील भारतीय विद्यापीठाच्या राष्ट्रीय पातळीवरील तायक्कांदो स्पर्धेत अनेक सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके जिंकली आहेत.ती डॉ अविनाश बारगजे सर व जया बारगजे यांची कन्या असून प्रविण सोनकुल यांचे तीला राष्ट्रीय , आंतरराष्ट्रीय पातळीवर मार्गदर्शन लाभत आहे. लातूर येथे पार पडलेल्या राज्य स्पर्धेत बीड जिल्ह्याचा राष्ट्रीय पदक विजेता खेळाडू ओंकार परदेशी याने रौप्यपदक तर देवेंद्र जोशी याने कांस्यपदक पटकावले आहे. ऋत्विक तांदळे, सुमित राऊत , सागर केळगंद्रे व प्रतिक कांबळे यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. लातूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय सिनिअर तायक्कांदो स्पर्धेत क्योरोगी प्रकारात कु. निकीता पवार ( जळगाव) व कानिफनाथ पोकळे ( पुणे) यांना तर पूमसे प्रकारात वंश ठाकूर व मृणाली हर्नेकर ( ठाणे ) यांना सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नयनच्या या यशाबद्दल डॉ. योगेश क्षीरसागर , डॉ. सारिकाताई क्षीरसागर, नितीनचंद्र कोटेचा, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, दिनकर चौरे , जया बारगजे, भारत पांचाळ, बन्सी राऊत, मनेश बनकर यांनी पदक विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी नयन बारगजे हिला शुभेच्छा दिल्या आहेत.

## केज मधील जुन्या क्रिकेट खेळाडूंचे निसर्गाच्या सानिध्यात रंगले स्नेह मिलन



केज दि ८ (प्रतिनिधी) -क्रिकेटच्या खेळामध्ये सतत मैदान गाजवणाऱ्या शहरातील सिनीयर क्रिकेट खेळाडूंचे स्नेह मिलन नुकतेच हर्षमय वातावरणात निसर्गाच्या सानिध्यात व शहरातील ज्येष्ठ खेळाडू शेख झफर यांच्या शेतात पार पडले. या स्नेह मिलनात सर्वांनी आपल्या केज शहराच्या जुन्या काळातील आठवणींना उजाळा दिला, सर्व खेळाडूंनी एकत्र येत स्नेह भोजनाचा मनमुराद आस्वाद घेतला. यावेळी क्रिकेटच्या मैदानावरच्या थरारक क्षणांची आणि त्या काळात केलेल्या गमती जमतींची चर्चा रंगली. उपस्थित सिनीयर खेळाडूया स्नेह मिलन उत्सवाला केज शहराचे अकबर इनामदार, प्रकाश मुंडे, शेख सिद्दीक भाई, अजिमभाई इनामदार, विजय आरकडे, मनोज मस्के, चांद कादरी, डॉ. शशी केंद्रे, प्रेमजीत हजारे, नय्युम मौजन, बंडू मस्के, विनोद गुंड, ॲड. भागवत ढाकणे, फशी मौजण, शेख जफर, शेख पाशाभाई, शिवाजी घुले, अप्पा हजारे, प्रशांत जाधव, नय्युम मौजन, ताहेर मुल्लासाब, मुजफ्फर सय्यद, अंकुश राऊत, रवि औटी, शेख खय्युम यांच्यासह अनेक जुने जाणते व उत्कृष्ट खेळाडू हजर होते. या सर्व सिनीयर क्रिकेटखेळाडूंनी एकमेकांचे अलीकडील जीवनमान आणि अनुभव जाणून घेतले. भविष्यात अशा प्रकारचे स्नेह मिलन नियमितपणे आयोजित करण्यावरही यावेळी चर्चा झाली, जेणेकरून मैदाना बाहेरील हे खास नाते अधिक दृढ होईल.

## जिमखाना क्रिकेट क्लबचा सौरभ राठोड याची यू १९ बीड जिल्हा क्रिकेट संघात निवड

बीड दि ८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित केलेल्या राज्यस्तरीय ण-१९ क्रिकेट स्पर्धेत रायगड येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी बीड जिल्हा क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली या संघात जिमखाना क्रिकेट क्लबचा अत्यंत मेहनती व कष्टाळू अष्टपैलू खेळाडू सौरभ राठोड यांने बीड जिल्हा क्रिकेट असोशियन मार्फत घेण्यात आलेल्या सराव सामन्यामध्ये चमकदार कामगिरी करत बीड जिल्हा क्रिकेट संघात आपले स्थान निश्चित केले..या निवडीबद्दल बीड जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर सचिव प्रा.डॉ.आमेर सलीम सर महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना समीर काझी , अनिल दादा जगताप,ॲड शेख शफीक भाऊ, ॲड सुभाष राऊत, संपादक शेख तय्यब , संपादक संतोष मानूरकर सर अभिजीत बरीदे प्रा.सचिन उबाळे, सलीम जहांगीर,अजिंक्य भैय्या चांदणे, निवड समिती सदस्य राजन साळवी, जिमखाना क्रिकेट क्लबचे अध्यक्ष रिजवान खान,जुबेर सिद्दिकी सर, प्रा.जावेद पाशा सर,महेश वाघमारे सर,मनोज जोगदंड, संतोष लारा वाघमारे,गोपाल गुरुखुदे,शेख आरीफ,शाहरुख पठाण अतिक कुरेशी, फैज देशमुख,जमीर खान,शहजाद बेग,सय्यद असीम, अतिष अंधारे,संतोष खरात,अक्षय नरवडे, वैभव पवार या सोबतच जिमखाना क्रिकेट क्लबचे प्रशिक्षक निसार तांबोळी यांच्यासह सर्व मान्यवरांनी या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## कै.रामराव मेंडके यांच्या गंगापूजन कार्यक्रमानिमित्त अनिल महाराज गायकवाड यांचे कीर्तन संपन्न

माजलगाव (प्रतिनिधी ) शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून गणले गेले पैलवान रामराव श्यामराव मेंडके यांना सोमवार दि.२४ नोव्हेंबर रोजी देवाज्ञा झाली होती.यानिमित्त गंगापूजनाचा किर्तन कार्यक्रम दि.७ डिसेंबर रोजी कालिका देवी मंदिरात आळंदीचे अनिल (महाराज) गायकवाड यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.यावेळी महाराजांनी उपस्थितांना आध्यात्मिक ऊर्जेचा विलक्षण अनुभव मिळवून दिला.

## जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विनायक मा व उच्च माविद्यालयात विविध स्पर्धा उत्साहात



बीड दि ८ (प्रतिनिधी)- शहरातील पेठ बीड भागातील विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकनेते माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात २ते ६ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्यानिबंध स्पर्धा ,प्रश्नमंजुषा ,सामान्य ज्ञान ,कथाकथन ,हस्ताक्षर ,रांगोळी ,चित्रकला स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

विविध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. विद्यालयात विविध स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री बेग रियाज सर ,शाळेचे उपमुख्याध्यापक अनुसे सर ,शाळेचे पर्यवेक्षक अमरापुरकर सर विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले .व स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडल्या.

# लग्ना निमित्त आर्वी येथील शांतीवनमध्ये अनाथ मुलांना केले १५० ब्लँकेटचे वाटप

पिंपळवंडी दि.८ (प्रतिनिधी)- यश व शुभांगी यांचा शुभविवाह नुकताच पाचेगाव गेवराई येथे मोठ्या उत्साहात पण संस्कारातून साजरा झाल .सध्या विवाह सोहळा म्हटलं की भला मोठा मंडप भला मोठा खर्च आलाच पण या सर्व गोष्टी करून ही आपण समाजाचं काही देणं लागतो या हेतूने आईच्या संकल्पनेतून व नातेवाईक तथा सामाजिक व्यक्ती किशोर काकडे यांच्या माध्यमातून आर्वी येथील शांतीवनच्या अनाथ मुलांना १५० ब्लँकेट देऊन एक आगळावेगळा उपक्रम विवाह सोहळ्यात



राबवल्याने सर्व स्तरातून कौतुक होत आहे.गेवराईच्या पाचेगाव येथे चव्हाण व पिंगळे यांच्या शुभविवाहत वेगळेपण दिसून आला.यश चव्हाण वर आईचे संस्कार कायमच योग्य झाले आहेत. तो पण पुढील काळात योग्य दिशा निस्वार्थीपणे सामाजिक बांधिलकी जपत काम करले हे संस्कार आई सुवर्णा चव्हाण यांनी दिले .समाजाला सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न आपल्या मुलाच्या विवाह सोहळ्यातून सुवर्णा चव्हाण यांनी केला आहे. सुवर्णा चव्हाण यांनी आपल्या मुलाच्या विवाह सोहळ्यात आर्वी येथील शांतीवनच्या अनाथ मुलांना दीडशे ब्लँकेटचं वाटप करून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. ब्लँकेट चे वाटप करतेवेळी शांतीवन च्या कावेरी नागरगोजे यांनी देणाऱ्याचे घेणाऱ्याचे हात हवेत असे नमूद केले...

## माहिती अधिकार संघावर निवड झाल्याबद्दल प्रदीप गायकवाड यांचा मान्यवराकडून सत्कार


केज दि ८८ (प्रतिनिधी)- माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या केज तालुका अध्यक्षपदी पत्रकार प्रदीप गायकवाड यांची नुकतीच निवड झाली याबद्दल रविवारी शासकीय विश्रामगृह केज येथे किसान सेलचे बीड जिल्हाध्यक्ष सीबीएस इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार समारंभ पार पडला.

या कार्यक्रमाला मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य व्यक्ती तसेच राजकीय व व्यावसायिक क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना इनामदार यांनी नमूद केले की, माहिती अधिकार हा सामान्य माणसासाठी प्रशासनापर्यंत पोहोचण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. समाज हिताचे प्रश्न निर्भीडपणे मांडणे, पारदर्शक प्रशासनाचा ध्यास घेणे आणि सर्वसामान्य नागरिकांचा आवाज बनणे हीच खरी लोकशाहीची ताकद आहे. तो अधिकार गायकवाड यांना मिळाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक पांडुरंग कसबे यांनी केले. या नंतर आंबेडकरी चळवळीत सक्रिय असलेले युवक नेते अशोक गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पत्रकार चंद्रकांत पाटील यांनीही आपले विचार मांडत माहिती अधिकाराच्या माध्यमातून लोकशाही बळकट होत असल्याचे सांगितले. डॉ. अजय कदम यांनी मनोगत व्यक्त केले . शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पत्रकार अनिल वैरागे यांनी केले. या प्रसंगी सतीश बनसोडे, सतीश खळगे, नंदकुमार मिसाळ, संजय लोंढे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते, आंबेडकरी चळवळीतील मान्यवर, माहिती अधिकार क्षेत्रातील प्रतिनिधी, व्यापारी व राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.

## ऐतिहासिक वास्तू कारंजा टॉवर समोर संपादक मुजीब शेख यांनी स्विकारल्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा

बीड दि ८ (प्रतिनिधी) - संपादक मुजीब शेख यांनी शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर समोर वाढदिवसाच्या शुभेच्छा स्विकारल्याने तसेच नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत त्यांनी त्यांच्या सासूमाई पालवे ताई यांचा जोरात प्रचार व प्रसार केल्याने त्या निवडून आल्यास कारंजा टॉवर या ऐतिहासिक वास्तूचे परिपूर्ण नूतनीकरण होईल का याची उत्सुकता या अनुषंगाने बीड शहरवासियांना लागली आहे.

मुजीब शेख यांचा वाढदिवस बीड शहराची ओळख असलेले ऐतिहासिक कारंजा टॉवर समोर साजरा करण्यात आला.यावेळी तालेब पटेल, सुरेश शेटे, झुंजार धांडे, खाजा शेख यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. मुजीब शेख यांनी ऐतिहासिक वास्तू समोर वाढदिवसाच्या शुभेच्छा स्वीकारताना निश्चितपणे या ऐतिहासिक वास्तूचे परिपूर्ण नूतनीकरण व सुशोभीकरण



करणे कसे आवश्यक आहे हे पाहिले . त्यांनी एका वृत्तपत्राच्या संपादकाच्या जबाबदारीसह नगराध्यक्ष पदासाठी त्यांच्या सासूमाई असलेल्या पालवे ताई यांच्यासाठी निवडणूकीत मोठे परिश्रम घेतल्याने मतमोजणीनंतर बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी त्या निवडून आल्या तर मुजीब भाई यांच्या माध्यमातून ऐतिहासिक कारंजा टॉवरचे परिपूर्ण नूतनीकरण व सुशोभीकरण होईल का याची उत्सुकता बीड शहरवासीयांना या निमित्ताने लागली असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.

## केज येथील नालंदा विद्यालयात महामानवास अभिवादन

केज दि ८ (प्रतिनिधी)- शहरातील नालंदा विद्यालय येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.नंदकुमार मस्के सर तर प्रमुख प्रमुख वक्ते म्हणून नवनथ कांबळे सर उपस्थित होते.

सर्वप्रथम परमपूज्य बोधिसत्व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दीप, धूपाने,व पुष्पाने पूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सचिन वाघमारे सर यांनी केले . शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी आर्यन बचके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अभिवादन पर आपले मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ शिक्षक कांबळे.एन.व्ही. सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील काही महत्त्वाचे प्रसंग विद्यार्थ्यासमोर मांडले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक नंदकुमार मस्के सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उघडून सांगितला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाघमारे. एस. बी.,कदम.एस.एस.,बडे.ऐ.टी.,श्रीमती गुरमे.टी.एम.,या कार्यक्रमाप्रसंगी सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी वाघमारे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

## बालसभेचे आयोजन करून गुरुनानक प्राथ. विद्यालयात महामानवास अभिवादन

बीड दि ८(प्रतिनिधी)- शहरातील शाहूनगर भागातील गुरुनानक प्राथमिक विद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन विद्यार्थ्यांनी बालसभा घेऊन साजरा केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन तसेच स्त्रियांचे उद्धारकर्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यासाठी गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीड येथील विद्यार्थ्यांनी बाल सभा आयोजित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांना अभिवादन केले. ''माझी शाळा -माझी जबाबदारी '' हा विषय यावेळच्या बाल सभेचा विषय होता. बाल सभेची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे अध्यक्ष, अतिथी, व्यवस्थापक, सूत्रसंचालक आणि आभार देखील विद्यार्थ्यांनीच मानले. प्रतिमापूजन केल्यानंतर शाळेत पुष्पवृक्षांचे रोपण करून कार्यक्रमाचे उदघाटन केले.विद्यार्थ्यांनीच अतिथीपदी विराजमान विद्यार्थ्यांचा फुले देऊन सत्कार केला. डोंगरे मॅडम यांनी प्रस्ताविक करत कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यावेळी कु. शेळके आरोही, जाधव समीक्षा, शेंडगे सई, पव्हणे आदिरा, गदळे अनुश्री, स्वामी अनुजा, काळे शुभांगी, जाधव अमृता, चि. चिरखे शिवराज, सपकाळ देवेश, भोसले भार्गव, बागवान जिशान, शहाणे समर्थ, स्वामी वैभव, जाधव संग्राम, काळे आदित्य यांनी मनोगत केले. यावेळी पंचवीस वर्षे बालवाडी चा वर्ग चालणाऱ्या हंगे मॅडम यांचा सत्कार करून सेवानिवृत्ती बद्दल त्यांना निरोप देण्यात आला. सृष्टी आंधळे आणि संजना जापडिया यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन केले तर आभार कु. शेख मुस्कान हिने मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले तर गदळे सर, श्रीमती पव्हणे मॅडम,, श्रीमती मुंडे मॅडम, तांदळे सर, शेळके मॅडम यांचे मार्गदर्शन राहिले.

# संपादकीय

## भ्रष्टाचार देशाला लागलेली किड

आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येत आहे. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वाधिक भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे. भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी भीष्म प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण देशातील वाढता भ्रष्टाचार कमी करणे देखील यांना जमले नाही. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५० अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही कमी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाचे ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले. देशाला लागलेली भ्रष्टाचाराची ही किड काही आज लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला किंवा नेत्याला सुळावर लटकावणे तर दूरच पण मोठी शिक्षा झाल्याचेही ऐकिवात नाही. विशेष म्हणजे ज्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना किंवा नेत्यांना लाचखोरी किंवा भ्रष्टाचारासाठी अटक होते ते नेते किंवा अधिकारी पुन्हा काही दिवसांनी त्याच खुर्चीवर विराजमान झाल्याचे पाहायला मिळतात. अटक होऊन काही दिवसांची शिक्षा भोगूनही भ्रष्टाचारी पुन्हा त्याच खुर्चीवर बसत असल्यानेच भ्रष्टाचार कमी होत नाही. भ्रष्टाचारी समजात उजळ माथ्याने फिरत असतात कारण त्यांना कायद्याची भीती आणि मनाची चाड नसते. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एकतरी लाचखोरीची किंवा भ्रष्टाचाराची बातमी वाचायला मिळेलच. एका एका अधिकाऱ्यांकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे. असा एकही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलिस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असले तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास सुरू आहे. आता तर शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र देखील भ्रष्टाचाराने बरबटले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे चालू आहे. देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू बाबा रामदेव यांच्यासह हजारो कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपनेही त्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरोधी वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टाचार कमी होईल असे वाटले होते मात्र भ्रष्टाचार तसूभरही कमी झाला नाही. विशेष म्हणजे त्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे एक नेते आज भ्रष्टाचार केला म्हणूनच जेलमध्ये आहेत.त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाउंगा... ना खाने दुंगा... असा सज्जड दम भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल पण तसे झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे.ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. आज कोणत्याही कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन भ्रष्टाचारी त्यांना जाळ्यात अडकवत आहेत. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांशी जनतेला आला आहे. राजस्थानातील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचेही हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्टाचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जायचे आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.

## युवकांच्या आग्रहास्तव रायमोहा जिपची धनंजय परजणे तर खालापुरी पं.स.ची निवडणूक अर्जुन डोके लढवणार

खालापुरी दि ८(प्रतिनिधी) -आगामी होणार शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा जिल्हा परिषद निवडणुकीत युवक व नागरिकांच्या आग्रहास्तव युवा नेते धनंजय बंडू परजणे हे तर खालापुरी पंचायत समितीची निवडणूक युवा नेतृत्व ग्राप सदस्य राहिलेले अर्जुन रावसाहेब डोके हे निवडणूक लढवणार आहेत. आतापर्यंत अनेक नेत्यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका लढवल्या मतदारांच्या आशीर्वादाने ही मंडळी निवडून आली परंतु आतापर्यंत कोणत्याच जि प पंस सदस्यांनी कुठलाच विकास न करता स्वतःच्या तुंबड्या भरल्या आहेत .अनेक वेळा संधी देऊनही पुन्हा त्यांनाच वारसा हक्क प्रमाणे आपली जहागिरी समजत पुन्हा निवडणुका लढवण्यासाठी जिल्हास्तरीय नेत्यांच्या मागेपुढे फिरताना दिसत आहेत वास्तविक पाहता आता वातावरण बदलले असून प्रस्थापितांना संधी देण्याऐवजी नवयुकांना संधी देण्यात यावी अशी ही मागणी मतदारांकडून होत आहे अनेक वर्ष पदे भोगुन विकास कंदील लाऊनही सापडेनासा झाला असल्याने. या नेत्यांविषयी संतापाची भावना व्यक्त केली जात असुन या स्वार्थी लोकांना संधी न देता नवयुवकांना संधी देण्यात याव्यात अशी मागणीही करण्यात येत आहेत. रायमोहा जिल्हा परिषद सर्कल मध्ये अपक्ष म्हणून युवा नेतृत्व धनंजय बंडू परजणे हे तर खालापूरी पंचायत समिती गणा मधून अर्जुन रावसाहेब डोके यांनी कंबर कसली असून कसल्याही परिस्थितीमध्ये आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती लढवण्याचे ठरवले आहे त्यांना युवकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे त्यामुळे हे दोन्ही नवयुवकांना महिला, जेष्ठ नागरिक गोरगरीब मतदारांनी त्यांना पाठिंबा देण्याचे ठरवले असल्याने रायमोहा जिल्हा परिषद साठी धनंजय बंडू परजणे तर खालापुरी पंचायत समिती साठी अर्जुन रावसाहेब डोके हे दोन्ही निवडणुका लढणार असल्याचे जनतेमध्ये चर्चिले जात आहे

## कुर्ला येथे जयदत्त आण्णा यांच्या वाढदिवसानिमित्त बक्षीस वितरण

बीड दि.८ (प्रतिनिधी)- आदर्श शिक्षण संस्थेचे यशवंत विद्यालय कुर्ला येथे माजी मंत्री संस्थेचे सचिव जयदत्त आण्णा क्षिरसागर यांच्या वाढ दिवस निमित्त विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अभिषेक राऊत, प्रमुख पाहुणे बीड बाजार समिती उपसभापती श्यामराव पडुळे, कुर्लाचे उपसरपंच महादेव पटेकर, औरंगपुर सरपंच गोरख चांगण, माजी सरपंच अनिल पाटील, राधकीसान पटेकर, पठाण मामु, संतोष पाटील,पर्यवेक्षक जामकर सर उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरवातीला काकु नाना यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व जयंती निमित जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले याप्रसंगी निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा, रांगोळी, कथाकथन, सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी विद्यार्थ्यांना आंबा, जांभूळ, चिकू यांची रोप देण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुपे सर आभार नागरगोजे सर यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धट मामा डाके मामा, मुळे यांनी परिश्रम घेतले

## गेवराई पं.स.कार्यालयात संत जगनाडे महाराज जयंती



गेवराई दि.८ (प्रतिनिधी) :- पंचायत समिती कार्यालयात सोमवारी संत शिरोमणी संताजी महाराज जगनाडे यांची जयंती प्रतिमा पूजन करून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, गटशिक्षणाधिकारी विठ्ठल राठोड, शि.वि.अधिकारी प्रविण काळम पाटील, शि.वि.अ. नांदुरकर शि.वि.अ. शेमे, नायगावकर, बापूसाहेब तारुरकर, डोईफोडे सर, श्रीमती गायकवाड, श्रीमती येरडलवार, केंद्रप्रमुख दहीवाळ सर आदी कर्मचारी उपस्थित होते.

## जि.प.शाळेत श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

नांदेड दि ८(प्रतिनिधी)- संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे सहाय्यक श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षिका संगिता बडवणे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सूरज गोडबोले, सदस्य आनंदा गोडबोले, ग्रामपंचायत कार्यालय कर्मचारी मारोती चक्रधर, अंगणवाडी सेविका इंदिरा पांचाळ, हैदर शेख, मनीषा गच्चे, हरिदास पांचाळ, बालाजी पांचाळ, चाँद शेख यांची उपस्थिती होती. प्रारंभी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांचे सहउपस्थित मान्यवरांनी संतोष जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनी विद्यार्थ्यांना संत संताजी जगनाडे महाराज यांच्या विषयी माहिती दिली. ढवळे म्हणाले की, असेच एकदा तुकाराम महाराज संताजींच्या गावी कीर्तनासाठी आले होते. त्यांची कीर्तने ऐकून संताजींवर तुकारामांचा मोठा प्रभाव पडला व त्यांनी संसार सोडण्याच्या निर्णय घेतला. तेव्हा तुकारामांनी संताजीना समजावून सांगितले, की संसारात राहूनही परमार्थ साधता येतो. आणि तेव्हापासून संताजी जगनाडे हे संत तुकाराम महाराजांच्या टाळकऱ्यांमध्ये सामील झाले. संत तुकारामांच्या सावलीत राहून त्यांनी तुकारामांचे अभंग उतरवून घेण्यास सुरुवात केली. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या विचारांना जिवंत ठेवण्याचे महान कार्य संत संताजी जगनाडे महाराजांनी केले. संताजी महाराजांनी 'तेलसिंधु, 'शंकरदीपिका', 'योगाची वाट', 'निर्गुणाचा नावाचे ग्रंथ लिहिले. त्यांनी सिंधु या ग्रंथातून तेलाच्या व्यवसायाची माहिती असल्याचे ढवळे यांनी सांगितले.

## ऊस दरवाढीबद्दल आंदोलन केलेल्या युवा शेतकरी संघर्ष समितीला माजलगाव राष्ट्रीय चर्मकार महासंघाने केले सन्मानित

माजलगांव दि.८(प्रतिनिधी):- गेल्या महिन्याभरापासून माजलगाव सह बीड जिल्ह्यामध्ये ऊस उत्पादक शेतकरी ऊसाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी युवा शेतकरी संघटनेच्या वतीने चक्काजामआंदोलन करून उत्पादन खर्चाच्या प्रमाणामध्ये ऊसाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी कारखाने बंद करून २७ ७५ भाव जाहीर करून घेतला शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची रास्त किंमत मिळवून देणाऱ्या लढावे शेतकऱ्यांचा माजलगाव राष्ट्रीय चर्मकार महासंघ यांच्या वतीने डॉ ओमप्रकाश शेटे आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य प्रमुख व नितीन नाईकनवरे माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांच्या हस्ते युवा शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख अजय राऊत, ॲड नारायण गोले पाटील, कॉम्रेड मोहनराव जाधव ,नामदेव सोजे पाटील,नारायण तर जगदीश फरताडे, तुकाराम नावडकर, कृष्णा सोळंके ,शुभम माने ,भास्कर खांडे, योगेश कानडे ,दिनकर चाळक ,विजय दराडे ,नितीन कचरे ,सोनाजीराव नाईकनवरे ,दिनकर रिंगणे , सतीशराव रींगने,अनिल राधे ,योगेश कानडे, यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या वेळी ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या अध्यक्ष भाषणामध्ये युवा शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे शेतकऱ्याच्या पिकाला योग्य भाव उपलब्ध करून दिल्याचे सांगत कौतुक करून मनःपूर्वक आभार व्यक्त केले व मी आपल्या संघर्ष समितीच्या पाठीशी असून भविष्य काळामध्ये होणाऱ्या आंदोलनात मी आपणास सर्व परी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले तसेच नितीन दादा नाईकनवरे यांनी युवा शेतकरी संघर्ष समिती कार्यकर्त्यांस कोणत्याही क्षणी फोन लावा मी पाठीमागे उभा राहीन माला आदर आहे आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके व युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या सत्कार समारंभाला मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते यावेळी सुभाष कांबळे गुड्डू खंडागळे संतोष जाधव राधाकिसन भाळशंकर,ॲाड दत्ता जाधव ,प्रसाद वाघमोडे संतोष खंडागळे, प्रकाश आगवणे, विकास गायकवाड, आकाश कांबळे, प्रकाश कांबळे ,बालासाहेब गवळी , सचिन वाघमारे, बंडू सोनवळे ,नितीन कांबळे ,सुरेश काजळे ,रामभाऊ उदमले, शिवाजी पवार ,भगवान कांबळे, बाळू पोहेकर, मयूर वाघमारे ,कालिदास सोनवणे सह बहुसंख्येने चर्मकार बांधव उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगताप सर व आभार प्रदर्शन यांनी केले

## स्व.गोपीनाथ मुंडे हे कार्यकर्ता निर्माण करण्याचा कारखाना होते

बीड दि ८ (प्रतिनिधी)-राजकारणी नेत्यांनी अनेक वेगवेगळे कारखाने काढले लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी आपल्या माणसे जोडण्याच्या शैलीमुळे कार्यकर्ते निर्माण करण्याचा कारखाना काढला होता,असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले.

लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर उद्घाटन प्रसंगी श्री.देशमुख म्हणाले मुंडे साहेबांनी आपले जीवन गोरगरीब वंचित लोकांसाठी वाहिले होते त्यांच्या उपमुख्यमंत्री कार्यकाळात मुंबईचा गँगवार व गुंडगिरी संपवली शेतकर्यांना दिलासा देणारा ऊस झोनबंदी उठवली वयाच्या २४ व्यावर्षी संघ विचारासाठी आणिबाणी मधे जेलमध्ये जाणारा नेता हा निस्वार्थी राजकारणी होता मुंडे साहेबांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत अनेक नेते कार्यकर्ते निर्माण केले. मुंडे हे सतत बेरजेचे राजकारण करत त्यामुळे मुंडे म्हणजे कार्यकर्ते निर्माण करण्याचा कारखाना होता या प्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित गेवराई भाजप नेते बाळराजे दादा पवार, सचिव श्री. शांतीनाथ डोरले, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष, संजय आंधळे, उपाध्यक्ष सुंदर चव्हाण, मंडळ अध्यक्ष मनोज पाटील, बीड तालुका सरचिटणीस महादेव नागरगोजे आदीसह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.लोकनेते मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचा कार्यक्रममाजी केंद्रीय मंत्री तथा लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त पिंपळनेर सर्कलच्या वतीने ताडसोन्ना येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरचिटणीस महादेव नागरगोजे, विठ्ठल नाना शिंदे, भागवत दुबाले, महेश कदम,अशोक मुंडे, मनोज गुंड, अशोक घोलप, बाळासाहेब नाकटिळक, अंबादास मुंडे, बाळासाहेब मुंडे, वचिष्ठ मुंडे, काकासाहेब बांडे, अशोक मुंडे, नवनाथ मुंडे, सीताराम मुंडे, गोरक्षनाथ मुंडे, आत्माराम मुंडे, बाबासाहेब गाडगे, अंगद देवडकर, फिरोज सय्यद, यशवंत मुंडे, अरुण राऊत यांच्यासह भारतीय जनता पार्टी पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त तलवाडयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



तलवाडा दि.८(प्रतिनिधी) :- भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर सर्व जाती-धर्मातील लोकांनी एकत्रितपणे जमा होऊन अभिवादन केले. तलवाडा येथे शनिवारी सकाळी १० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. यावेळी महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष पत्रकार बापू गाडेकर, माजी पं.स.सदस्य - शेख खलील भाई, प्रा.गणपत नाटकर, पिन्टूशेठ गर्जे, मोईद्दीन इनामदार यांच्या हस्ते पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी प्रा.गणपत नाटकर, माऊली डोंगरे, अशोक आठवले व नजीरभाई कुरेशी यांनी मनोगत व्यक्त करून मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलताना नजीरभाई कुरेशी म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा महाविद्वान या देशात नव्हे तर जगात पुन्हा होणार नाही, त्यांनी या देशातील आठरापगड जातीला न्याय मिळावा यासाठी भारतीय संविधानात तरतूद केली. जर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले नसते तर या देशातील लोकांचे काय झाले असते याचा विचार न केलेला बरा असे मत त्यांनी व्यक्त केले. सध्याच्या काळात स्वतः चे अस्तित्व टिकवण्यासाठी राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी तसेच इतरही लोक एकमेकांच्या जीवावर उठलेले आहेत. या सर्व लोकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह इतर सर्व महापुरूषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सौहार्दाचे वातावरण निर्माण करावे. तसेच पंडित - पवारांनी आपसात भांडणे न करता जनतेला योग्य ती दिशा देण्याचे काम करावे असेही नजीरभाई कुरेशी यांनी यावेळी बोलताना सांगितले. तलवाडा येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमास महिला - पुरुष व युवक मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.सुरेश गांधले यांनी केले.

## प्रगती सेवाभावी संस्थेच्या पाझर एकांकिकेस तृतीय पारितोषिक



लातूर दि ८(प्रतिनिधी)- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा लातूर आयोजित नटवर्य श्रीराम गोजमगुंडे एकांकिका स्पर्धेत प्रगती सेवाभावी संस्थेच्या पाझर एकांकिका स्पर्धेत सांघिक तृतीय सह एकूण सहा पारितोषिक प्राप्त झाले.

अधिक माहिती अशी की, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा लातूर आयोजित नटवर्य श्रीराम गोजमगुंडे राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत २५ संघांमधून प्रगती सेवाभावी संस्था पाडळी ने सादर केलेली व प्रवीण पाटेकर लिखित व संतोष पैठणे दिग्दर्शित पाझर एकांकिकेस सांघिक तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. तसेच स्त्री अभिनय प्रथम - विनिता सवणे, प्रकाशयोजना द्वितीय - संतोष पैठणे, दिग्दर्शन द्वितीय - संतोष पैठणे, संगीत तृतीय - कबीर जाधव, यांना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. या एकांकिकेत सीमा प्रजापती, विनिता सवणे, रोशनी चव्हाण, अपर्ण तूप सागर, निकिता अंधारे, आकांक्षा शेटे, अर्पिता काकडे यांनी भूमिका केल्या तर संपूर्ण संघाला गणेश अवंतकर सर, लक्ष्मीकांत दोडके सर, रोहित पुराणिक सर, संतोष पैठणे सर यांनी मार्गदर्शन केले.

## माजी मंत्री क्षीरसागरांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



नवगण राजुरी दि.८(प्रतिनिधी) - जि.प.कें.प्रा. शाळा, पिंपळवाडी येथे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

जि.प.कें.प्रा. शाळा, पिंपळवाडी येथे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.जि.प.कें.प्रा.शाळा, पिंपळवाडी येथे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांना श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे संचालक अर्जुन बहीरवाळ यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले तसेच शाळेतील भिंतींची रंगरंगोटी करून या बोलक्या भिंतीचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पिंपळवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदिप जगताप, जि.प.कें.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती, सर्व कर्मचारी, माजी विद्यार्थी, शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## चार चाकीच्या धडकेत जखमी दुचाकीस्वाराला कोठारी यांनी केले रुग्णालयात दाखल

जामखेड दि ८(प्रतिनिधी)- शहरापासून पासून पाच किलोमीटर अंतरावर सारोळा रस्त्यावर मोटरसायकल व चार चाकी वाहनाचा अपघातात एक जण जखमी झाला. याबाबतच्यह घटनेची माहिती विनीत गुंदेचा आणि प्रदीप आजबे यांनी सकाळी नऊ वाजता सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना दिली असता लागलीस त्यांनी आपली रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी धाव घेऊन यातील जखमीला ताबडतोब जामखेड येथील पन्हाळकर हॉस्पिटलमध्ये दाखल करून,वेळेवर उपचार मिळवून दिले. यासंदर्भात माहिती अशी की सोमवारी सकाळी नितीन मनोहर आजबे (वय ३७, राहणार शिराळ ता. आष्टी ) हा जमदारवाडी वरून जामखेडकडे येत असताना, चार चाकी वाहनाची धडक बसल्याने तो जबर जखमी झाला.संजय कोठारी हे केवळ पाच मिनिटात अपघातस्थळी पोहोचल्याने लोकांनी त्यांचे कौतुक केले. सदर अपघाताची माहिती सामाजिक कार्यकर्ते कोठारी यांनी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना दिली असून, पुढील तपास चालू आहे.



**मादळमोही-गेवराई तालुक्यातील मादळमोही ग्रामपंचायत कार्यालयात थोर संत श्री संत संताजी जगनाडे महाराज यांना जयंती निमित्त अभिवादन करताना सरपंच राजेंद्र वारंगे,माजी सरपंच अरूणजीजा वाघमारे, माजी सभापती पंढरीनाथ लगड,ग्रा.प.सदस्य हरीभाऊ भोपळे, रामेश्वर जाधव आदी.**

## दिल्लीच्या कृषी जागरण संस्थेतर्फे अतुल कुलकर्णी सन्मानित

दिंद्रुड दि.८ (प्रतिनिधी)- दिल्ली येथील कृषी जागरण संस्थेमार्फत दिला जाणारा एम.एफ.ओ.आय.(मिलेनियर फार्मर ऑफ इंडिया) हा पुरस्कार बीड जिल्ह्यातील धनलक्ष्मी कृषी सेवा केंद्र चालक अतुल सोमेश्वर कुलकर्णी यांना मिळाला आहे. कृषी व बीज उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला या संस्थेकडून हा पुरस्कार दिला जातो. रविवार दि.सात रोजी दिल्ली येथे मेला ग्राउंड या ठिकाणी झालेल्या भव्य कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला आहे. धनलक्ष्मी कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून मेहनत आणि प्रयत्नाने अतुल व राहुल कुलकर्णी या बंधुनी कृषी व्यवसाय व बीज उत्पादनात कमालीची कामगिरी केली आहे! याची दखल घेऊन दिल्ली येथील कृषी जागरण संस्थेकडून अतुल कुलकर्णी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. खउ-ठ नवी दिल्लीचे प्रमुख डॉ.चंद्रबत्रा सर, गुजरात नॅचरल फार्मिंक सायन्स युनिव्हर्सिटी व्हा.चान्सलर सि.के.तिंम्बाडीया, कृषी जागरण चे सीईओ एम.सी.डोमिनिक आदी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल प्रताप काशिद, विशाल गौंडर,नागेश कानडे,नागेश ठोंबरे, महेश ठोंबरे, कैलास साळुंके, प्रकाश काशिद सह मित्र परिवारांनी कुलकर्णी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# कुंभमेळ्यातील वृक्षतोडीचा निर्णय तात्काळ रद्द करणेसह वृक्षप्रेमी सयाजी शिंदे यांना पाठिंबा

## डॉ गणेश ढवळे यांचे दीपमाळ परिसरात आंदोलन

**बीड दि ८ (प्रतिनिधी) झाडे लावा-झाडे जगवा या नावाखाली जाहिरातींवर कोट्यवधी रुपये खर्च करणारे शासन एकीकडे पर्यावरण संवर्धनाचे गोडवे गात असताना दुसरीकडे नाशिक येथील तपोवन परिसरात कुंभमेळ्यासाठी साधुग्राम उभारण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचा तीव्र निषेध करत तपोवन वाचवा - झाडे वाचवा - देश वाचवा ही जनजागृती मोहीम सोमवार आठ डिसेंबर रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ गणेश ढवळे यांच्या नेतृत्वात खंडेश्वरी दीपमाळ येथे राबवण्यात आली यावेळी तपोवन वाचवण्यासाठी पुढाकार घेणारे वृक्ष मित्र सयाजी शिंदे यांना पाठिंबा देखील देण्यात आला.**

यासंदर्भात माहिती अशी की शहरातील खंडेश्वरी दीपमाळ परिसरात पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत हरित बीड अभियानांतर्गत १५ हजार रोपांची लागवड करण्यात आली होती. या परिसरातील बहुतांश रोपे आता नष्ट/काड्या झाल्याची वस्तुस्थिती यावेळी उघड झाली. दरम्यान सामाजिक कार्यकर्ते डॉ गणेश ढवळे यांनी आपल्या सहकार्यासह खंडेश्वरी दीपमाळ येथे आंदोलन केले. यावेळी तपोवनातील वृक्षतोड थांबवण्यासाठी या वृक्षतोडीला सिनेअभिनेता तथा वृक्षप्रेमी सयाजी शिंदे यांनी विरोध केला तसे यावेळी त्यांना पाठिंबा देण्याच्या घोषणाबाजी देखील करण्यात आल्या या आंदोलनानंतर जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शेख युनुस, शिवशर्मा शेलार, मुबीन शेख, अशोक येडे (जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक बीड) कॉ. डी.जी तांदळे (अध्यक्ष महाराष्ट्र किसान सभा जिल्हा बीड), मिलिंद सरपते ( शहराध्यक्ष वंचित बहुजन आघाडी बीड) अभिमान खरसाडे ( अध्यक्ष निसर्गभुमी संवर्धन संस्था बीड), काम्रेड ज्योतीराम हुरकुडे ( किसानसभा जिल्हा सेक्रेटरी बीड), बाजीराव ढाकणे (पर्यावरण मंच बीड), नवनाथ हुरकुडे (उबाठा शिवसेना बीड), कुणाल नाईकनवरे (पर्यावरण प्रेमी), राजेंद्र आमटे (निसर्गप्रेमी) यांच्यासह उपस्थित नागरिकांनी आंदोलनात सहभाग दर्शवला व कुंभमेळा मंत्री व नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी तपोवन परिसरात साधुग्राम उभारण्यासाठी सुमारे १,८०० प्रौढ झाडे तोडण्यास मंजुरी दिली आहे. पर्यावरणप्रेमींच्या संतप्त प्रतिक्रियेनंतर प्रशासनाने इतरत्र १५,००० झाडे लावू, असा दावा करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला.हा निर्णय पर्यावरणविरोधी, अविवेकी व लज्जास्पद असल्याचे सांगत झाडतोडीची परवानगी तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात श्री.संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी



बीड(प्रतिनिधी): सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते श्री.संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर म्हणाले की, श्री.संताजी जगनाडे महाराज यांच्या जीवन व कार्याचा परिचय करून दिला. महाराजांनी तेरा दिवसात संत तुकारामाच्या गाथेचे पुर्नलेखन केले.त्यामुळे लोकांना त्यांचे कौतुक वाटू लागले. तुकारामाची गाथा,शंकर दिपीका, प्रकाश दीप, घाण्याचे अभंग, तैलसिंधु अशा अनेक ग्रंथाची रचना केली.संत तुकारामांचे पट्टशिष्य समाजाचे आराध्य दैवत,समाज सुधारक असे थोर संत श्री.संताजी जगनाडे महाराज यांची आज जयंती साजरी करण्यात येत आहे.त्यांचा जन्म ८ डिसेंबर १६२४ मध्ये पुणे जिल्हयातील सुदूंबरे (पुणे) या गावी झाला.बालपणापासून त्यांना भजन,कीर्तन व परमार्थ मार्गाची आवड होती. चक्रेश्वरांच्या मंदीरात संत तुकाराम महाराजांचे कीर्तन श्री.संताजी जगनाडे महाराज यांच्यात भक्तीज्ञान वैराग्य निर्माण झाले.जगनाडे महाराज हे प्रखर विचारवंत होते. परमेश्वर म्हणजे काय ? मूर्ती पूजा, मानवी मूल्य,उपवास समाजासाठी कसे उपयोगी आहेत त्याचा ऊहापोह केला.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, पदव्युत्तर संचालक डॉ.ए.एस.खान,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रा. प्रदिप साळुंके यांनी मानले.सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी राष्ट्रधर्म हाच खरा धर्म असल्याची भावना जागृत ठेवावी - डॉ.ओमप्रकाश शेटे

## दिंद्रुडच्या खोलेश्वर विद्यालयात माता पालक मेळावा संपन्न



दिंद्रुड दि. ८ (प्रतिनिधी)-शाळेत प्राथमिक शिक्षण घेत असतांनाच खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही जगतव्यापी प्रेमाची भावना आपल्या सर्वांना शिकवली गेली आहे. संत ज्ञानेश्वरांनी सुद्धा ईश्वराकडे पसायदानाच्या माध्यमातून जगाचे कल्याण मागितले आहे. त्यामुळे खरी सहिष्णुता व मानवतावाद शिकवणारा आपला खरा धर्म हा राष्ट्रधर्म असल्याची भावना प्रत्येक विद्यार्थ्यांनी मनात जोपासावी असे आवाहन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले.दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयात आयोजित माता- पालक मेळाव्यात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते.

राजमाता जिजाऊ मॉसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापूजनाने व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांसह ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन झाले. मयंक गांधी यांच्या सौभाग्यवती सौ.मीनल गांधी, देवानंद कुलकर्णी (टेक सिद्धी ॲडव्हर्ट प्रा.लि.पुणे) असोसिएट प्रोफेसर फार्माकॉलॉजी संभाजीनगर चे व्यंकटेश खडके, हेड क्वालिटी अजंठा फार्म चे सुनील महाजन,दिंद्रुड पो.स्टे.चे सपोनि.महादेव ढाकणे संस्था अध्यक्ष दिलीपराव पारेकर या मान्यवरांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती. खोलेश्वर विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव पारेकर व विद्यार्थ्यांनी मान्यवरांचे, विद्यार्थ्यांनी रेखाटलेले चित्र व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.खोलेश्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सरिता फपाळ यांनी प्रास्ताविक केले.प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले दिंद्रुड चे भूमिपुत्र देवानंद कुलकर्णी, सुनील महाजन, प्रो.व्यंकटेश खडके यांनी विद्यार्थ्यांना येथील आपल्या मातीतील आणि कार्यातील अनुभव सांगत मार्गदर्शन केले.आता या परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा जिल्हा बाहेर जाण्याची गरज नाही एवढे चांगले शिक्षण या ठिकाणी मिळू लागल्याचे म्हटले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तसेच महापुरुषांचे विचार आत्मसात करण्याची व सुसंस्कारित होण्याची गरज आहे. असे मत सपोनि. ढाकणे यांनी मार्गदर्शनपर व्यक्त केले. सिरसाळा जवळ शेतकऱ्यांच्या विकासासाठी उभा केलेले कृषीकुल ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी उद्घाटक म्हणून बोलताना म्हणाले,रात्रंदिवस काबाडकष्ट करून जगाला अन्नधान्य पुरवणारा शेतकरी अनेक संकटात आहे. शेतकऱ्याचे ऋण आपल्यावरती आहे ते ऋण फेडण्यासाठी मी या ग्लोबल विकासाच्या माध्यमातून काम सुरू केलेलं आहे. आपल्याला देश बदलायचा असेल तर शेतकऱ्यांचं उत्पादन वाढलं पाहिजे असे मोलाचे विचारही त्यांनी मांडले. तसेच पारंपारिक पिकाला बगल देऊन फळबागासारखे पीक घ्यायला सुरुवात करा असेही त्यांनी आव्हान केले.कु.शेप श्वेता व खंदारे वैष्णवी यांनी सूत्रसंचालन केले. खोलेश्वर परिवाराच्यावतीने सर्वांचे आभार मानण्यात आले. माता पालक वर्ग व पंचक्रोश्यातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौसाळा-देवीबाभुळगाव रस्त्यावरील साईड पंख्यावर रोवले विजेचे खांब

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करणार-विवेक कुचेकर

चौसाळा दि.८ (प्रतिनिधी) : महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चाकरवाडी या देवस्थानकडे चौसाळा - देवीबाभुळगाव - सात्रा - पोत्रा - आंबील वडगाव मार्गे चाकरवाडीला जाणाऱ्या रस्त्यावर चौसाळा ते देबीबाभुळगाव च्या दरम्यान महावितरण विभागा मार्फत वीज वाहिनीचे खांब (पोल) उभारण्याचे काम सुरू आहे. सदरील कामामध्ये अनेक ठिकाणी वीज पोल रस्त्याच्या कडेला साईड पंख्यावर अवघ्या ४ ते ५ तर कुठे ५ ते ६ फुट अंतरावर उभे केले गेले असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी केला आहे.

सदरील रस्ता हा चाकरवाडी या देवस्थानकडे जात असल्याने हा दैनंदिन मोठ्या प्रमाणावर वापरला जाणारा रस्ता असून वाहतुकीची वर्दळही कायम मोठ्या प्रमाणात असते. अशा परिस्थितीत रस्त्याला लागूनच उभारलेले वीज पोल हे वाहतुकीस गंभीर धोका निर्माण करणारे असून त्यातून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रवाशांना पुढील परिणाम उद्भवू शकतात - वाहनांचे रस्त्यावरून सुटण्याची किंवा घसरून पोलला धडकण्याची शक्यता वाढते, दोन चाकी व चार चाकी वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही अपघाताचा धोका निर्माण होत आहे, रात्रीच्या वेळी दृश्यमर्यादा कमी असल्याने अपघाताची शक्यता अधिक वाढत आहे, महावितरणच्या नियमांनुसार मुख्य रस्त्यापासून सुरक्षित अंतर राखूनच वीज पोल उभारणी करणे बंधनकारक आहे. त्या संदर्भात नियमांचे पालन न झाल्याचे दिसून येते.

सदरील कामाकडे महावितरण कार्यालय जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच किमान आता तरी महावितरण विभागाने व सदरील कंत्राटदार कंपनीने, सदरील बाबीची तात्काळ दखल घेऊन चौसाळा ते देवीबाभुळगाव या मार्गावरील वीज पोलचे पुनर्मापन करून ते महावितरणच्या नियमांप्रमाणे रस्त्यापासून सुरक्षित अंतरावर स्थानांतरित करण्यात यावेत अन्यथा बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी केला आहे.

## 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी

नांदेड: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज दि.०८ डिसेंबर, २०२५ रोजी संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम, के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. पृथ्वीराज तौर, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, डॉ. लक्ष्मीकांत आगलावे, राजू द्याडे, पंडित माने, गोविंद हंबर्डे, प्रकाश चित्ते, कपिल हंबर्डे, दादाराव हंबर्डे, चंद्रकांत हंबर्डे, बबन हिंगे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# सर्वांना सोबत घेऊन चालणारा वारकरी संप्रदाय-महंत संभाजी महाराज

## सिरसमार्ग येथे सप्ताहाची उत्साहात सांगता



बीड (प्रतिनिधी ) : कोणताही भेदभाव न पाळता सर्वांना सोबत घेऊन चालणारा वारकरी संप्रदाय असल्याचे मत श्री क्षेत्र नारायण गडचे उत्तराधिकारी महंत संभाजी महाराज यांनी व्यक्त केले. ते, गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनात बोलत होते.

यावेळी लक्ष्मण नाना तकीक महाराज, वे. शा. सं. बबनदेव जोशी, धुराजी महाराज कोळेकर, भाऊसाहेब जोशी, परमेश्वर जाधव, ज्ञानेश्वर चव्हाण, मोहनराव पवळ सर, गौतम पंडित, रामराव पवळ आदींसह भाविक उपस्थित होते. महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या आशीर्वादाने सिरसमार्ग येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते. सोमवारी महंत संभाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. यावेळी बोलताना संभाजी महाराज म्हणाले की वारकरी संप्रदायाला समतेचे अधिष्ठान आहे. समाजातील सर्व जाती-धर्माला सोबत घेऊन चालणारा हा संप्रदाय आहे. माणसाला माणूस म्हणून जागणारा व घडवणारा हा नामयज्ञसोहळा आहे. राम कृष्ण हरी हा वारकरी संप्रदायाचा मंत्र आहे, हा मंत्र म्हणजे न्याय, प्रेम व समता असल्याचे ते म्हणाले. समाजामध्ये दानधर्माला मोठे महत्त्व आहे, या आधुनिक युगात वंचित घटक व विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दान करण्याचे आवाहनही संभाजी महाराज यांनी केले. दुष्काळ असो, महापूर असो वा कोरानासारख्या आजाराच्या साथी असो, माणूस म्हणून एकमेकांना आधार द्या, एकमेकांना मदत करा, ही शिकवण वारकरी संप्रदायाची आहे, यातुनच आपल्या समाजाची जडणघडण झाल्याचेही ते म्हणाले. आजही समाजाला दिशा देण्याचे व सन्मार्गाला लावण्याचे कार्य साधु-संत करतात, समाजासाठीच साधुसंतांचे जीवन असल्याचेही ते म्हणाले. या कीर्तनानंतर भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी गोकुळ जाधव, शंकर गोयकर, अविनाश आरेकर,बाळू पवार, बाळू कोळेकर, रामप्रसाद देवकर, गोविंद कदम, कृष्णा महाराज, बंडू महाराज कदम, भगवान सागडे आदींसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्री क्षेत्र दत्तधाम येथे दत्त जन्मोत्सव भक्तिभावात व उत्साहात साजरा

परळी दि.८ (प्रतिनिधी) : भगवान शंकराचार्य महाराजांनी प्रतिकाशीचा मान दिलेल्या श्री क्षेत्र दत्तधाम येथे दत्त जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात व आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी ८ ते १० या वेळेत रुद्राभिषेक पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. परिसरात मंत्रोच्चार, भक्तीभाव आणि चैतन्यपूर्ण ऊर्जा अनुभवायला मिळत होती.

यावेळी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज म्हणाले, भगवान दत्तात्रेय हे समस्त विश्वाचे मार्गदर्शक असून दत्त उपासनेतून मनाला परम शांती प्राप्त होते. माणसाने आपल्या जीवनात नियमबद्धता आणली पाहिजे, स्वतःवर संयम ठेवत सातत्याने चांगले कर्म करावे, हाच खरा ईश्वरपूजनाचा मार्ग आहे. आपणच आपले भवितव्य घडवत असतो, हे लक्षात घेऊन जीवनात सकारात्मकतेने वाटचाल करावी, असे मौलिक विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या पवित्र तीर्थक्षेत्री औदुंबर वृक्ष, गोमातेचे व धुनीचे दर्शन भाविकांना लाभते. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. या कार्यक्रमास उद्योजक मधुकर आघाव, संजयजी आघाव, श्रीहरी गुट्टे, प्रभाकर दहिफळे, शिवसेना महाराष्ट्र समन्वयक फुलचंदराव कराड, संदीपान आंधळे, माजी सरपंच विठ्ठल गुट्टे, भाष्कर गुट्टे यांच्यासह अनेक मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री बंकटस्वामी महाविद्यालयात शिष्यवृत्ती संदर्भात विशेष मार्गदर्शन शिबिर संपन्न

बीड दि.८ (प्रतिनिधी) : श्री बंकटस्वामी महाविद्यालयात शिष्यवृत्ती विशेष पंधरवाडा सप्ताह निमित्त विशेष मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर धांडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री प्रसाद शुक्ला, शिष्यवृत्ती प्रमुख, इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग, बीड, उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे व्यासपीठावर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये प्रमुख मार्गदर्शक श्री प्रसाद शुक्ला यांनी विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांविषयी सविस्तर माहिती दिली. महाDBT पोर्टलवर अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रे, महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांच्या संयुक्त शिष्यवृत्ती योजना, ग्रामीण व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शिष्यवृत्तींची पात्रता याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.यावेळी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज न केल्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे मानले जाते. त्यामुळे शेवटचे टी.सी. घेताना संपूर्ण फी भरावी लागते. यामुळे आर्थिक व शैक्षणिक नुकसान विद्यार्थ्यांचेच होते. विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.शिवाजी मोरे यांनी केले. शिबिराच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ.शंकर धांडे यांनी विद्यार्थ्यांना शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाचे डॉ. राजीव काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रमोद जाधव यांनी मानले. शिबिरासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त अट्टल महाविद्यालयात रक्तदान शिबीर संपन्न

गेवराई दि.८ (प्रतिनिधी) :- मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल महाविद्यालय गेवराई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा रेड रिबन क्लब आणि राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या हस्ते या रक्तदान शिबीराचे उद्घाटन संपन्न झाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.रजनी शिखरे, उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. सूरज कोठावळे, उपजिल्हा रुग्णालयाचे समुपदेशक सुनील सरवदे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ विक्रम तिडके, जिल्हा रुग्णालय बीड येथील प्रयोगशाळा तंत्रज्ञ विनोद रावताळे, सतीश गायकवाड, डॉ.प्रशांत पांगरीकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बालाजी रुपनर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य नवनाथ गोरे आदीजण याप्रसंगी उपस्थित होते. या रक्तदान शिबीरामध्ये २१ जणांनी स्वेच्छेने रक्तदान केले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अरुण जाधव, डॉ.देविदास रिठे, डॉ.गणेश सूर्यवंशी, प्रा. सुरेश ढाकणे, मराठी विभाग प्रमुख डॉ.समाधान इंगळे, डॉ.शरद सदाफुले, तसेच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक दिशा सपकाळ, सतीश ठाकर, पुनम सौंदरमल, वरद नवपूते, करण कुलकर्णी, कॅडेट आदर्श कदम, गणेश जरांगे यांनी विशेष परिश्रम घेतले.


## जाहिर प्रगटनास कायदेशीर उत्तर

**जाहिर प्रगटनास उत्तर देणार: दिपक त्रिंबकराव नाईकवाडे,** वय ४० वर्षे, धंदाः शेती व नौकरी रा. हिवरगव्हाण, ता. वडवणी जि. बीड

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, शिवार मौजा पुसरा ता. वडवणी जि. बीड येथील गट नं. १४१ मधील ०० हे.९२ आर जमीनीचे आमचे अशील दिपक त्रिंबकराव नाईकवाडे हे मालक व ताबेदार आहेत. सदर जमीनीपैकी ०० हे.७२ आर जमीनीबाबत विनोदकुमार पन्नालालजी नहार रा. वडवणी यांनी दि.०८/१२/२०२५ रोजी दै. पार्श्वभूमी या वर्तमानपत्रात चुक, खोटे, बेकायदेशीर, वस्तुस्थिती व कायद्याविरुध्द जाहीर प्रगटन प्रसिध्द करून त्यांचा आमचे अशीलाबरोबर व्यवहार झाल्याचे खोटे भासविले आहे. वास्तविक पाहता त्यांचा व आमचे पक्षकाराचा आजपर्यंत कोणताही लेखी अथवा तोंडी व्यवहार झालेला नव्हता व नाही. त्यामुळे विनोदकुमार पन्नालाल नहार रा. वडवणी यांना वर नमुद प्रमाणे जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार पोहचत नाही.

सर्व जनतेस असे कळविण्यात येते की, विनोदकुमार पन्नालाल नहार यांचे बरोबर कोणीही नमुद जमीनी बाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये, विनोदकुमार पन्नालाल नहार हे आमचे अशीलाची व इतरांची या जाहीर प्रगटनद्वारे फसवणुक करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे आमचे अशील हे विनोदकुमार पन्नालाल नहार यांचे विरुध्द योग्य ती दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करणार आहेत. सबब विनोदकुमार पन्नालालजी नहार यांनी दि. ०८/१२/२०२५ रोजी दै. पार्श्वभूमी या वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहीर प्रगटनास तिव्र आक्षेप/कायदेशीर उत्तर.

दिनांक : ०८/१२/२०२५

**मार्फत :**
**ॲड. व्ही. व्ही. फपाळ**
जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव
ऑफीस : शांतीनिकेतन बायपास रोड, माजलगाव जि. बीड
मो.नं.९९२२७०२८५०/९४२०००२८५०

**जाहिर प्रगटनास उत्तर देणार**
**दिपक त्रिंबकराव नाईकवाडे**
रा. हिवरगव्हाण, ता. वडवणी जि.बीड
मो. नं. ९०३५७४६९४४

## जाहिर प्रगटन

**जाहिर प्रगटन देणार : दिपक त्रिंबकराव नाईकवाडे,** वय ४० वर्षे, धंदाः शेती व नौकरी रा. हिवरगव्हाण, ता. वडवणी जि. बीड
**मार्फत : ॲड. व्ही. व्ही. फपाळ,** जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, शिवार मौजा पुसरा ता. वडवणी जि. बीड येथील गट नं.१४१ मधील क्षेत्रफळ १२ हे.५९ आर पो.ख.७२ आर एकूण १३ हे.३१ आर एकूण आकार २८ रु.४४ पैसे हिरसापूर्ण पैकी ०० हे.९२ आर जमीन आकार ०२ रु.०८ पैसे पो. ख.०.१० आर पैकी ०० हे.८० आर जमीन जिची चतुःसिमा **पुर्वेस :** विक्रम माने, **पश्चिमेस :** कपील भुजंगराव नाईकवाडे, **दक्षिणेस :** अनिता गणेश राठोड व सुनिता सर्जेराव राठोड, **उत्तरेस :** बीड परळी हायवे.

वरील जमीनीबाबत आमचे अशीलाने दि. ०९/०५/२०२५ रोजी निवृत्ती गोविंदराव नाईकवाडे रा. पुसरा ता. वडवणी जि.बीड ह.मु. आंबेगाव बु. पुणे शहर यांचे बरोबर खरेदी विक्री बाबत इसारपावती नोटरी द.अ.क्र.४२८/२०२५ हा दस्त केला होता व सदर दस्तामध्ये दि.१०/१०/२०२५ रोजी ठरावाची उर्वरीत रक्कम घेवून जमीनीचे खरेदीखत करून घेण्यास ठरले होते. परंतू ठरावाच्या अटी, शर्तीप्रमाणे निवृत्ती गोविंदराव नाईकवाडे यांनी त्यांचे हक्कांत प्रस्तुत जमीनीचे खरेदीखत करून घेतले नाही व ठरावाचे नियम व अटींचा भंग केलेला आहे. त्यानंतर आमचे अशीलाने वेळोवेळी निवृत्ती गोविंदराव नाईकवाडे यांना तोंडी विनंती करून देखील त्यांनी नमुद कराराची पुर्तता केलेली नाही. आमचे अशीलाने त्यानंतर दि. २४/११/२०२५ रोजी ॲड. एस.ए.लंगे यांचे मार्फत निवृत्ती गोविंदराव नाईकवाडे यांना कायदेशीर नोटीस पाठवून देखील त्यांनी त्यांचे हक्कांत आजपर्यंत कराराप्रमाणे खरेदीखत नोंदवून घेतले नाही. आमचे अशील सदर खरेदीखत करून देण्यास तयार असतांना देखील त्यांनी खरेदीखत नोंदवून घेतलेले नाही. त्यामुळे आजरोजी आमचे अशील असे सर्व जनतेस जाहीर करतात की, दि. ०९/०५/२०२५ रोजी आमचे अशील व निवृत्ती गोविंदराव नाईकवाडे यांच्यामध्ये ॲड. एस. बी. गरड माजलगाव यांचे नोटरी कार्यालयात झालेला नोटरी द.अ.क्र. ४२८/२०२५ दस्त रद्द समजण्यात येत आहे व सदरचा करार संपुष्ठात आलेला आहे. त्यामुळे निवृत्ती गोविंदराव नाईकवाडे यांचेशी अमचे अशीलाचे मालकी व ताब्यतील वर नमुद जमीनीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये. सबब हे जाहिर प्रगटन,

दिनांक : ०८/१२/२०२५

**मार्फत : ॲड. व्ही.व्ही.फपाळ**
जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव
ऑफीस : शांतीनिकेतन बायपास रोड, माजलगाव जि. बीड
मो.नं.९९२२७०२८५०/९४२०००२८५०

जाहिर प्रगटन देणार
**दिपक त्रिंबकराव नाईकवाडे**
रा. हिवरगव्हाण, ता. वडवणी जि. बीड
मो.नं.९०३५७४६९४४

**धुनकवड पंचायत समिती गणात बदल हवा रामलिंग मुंडे यांची चर्चा**

बीड दि.८ (प्रतिनिधी)–आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांचे बिगुल वाजण्याची तयारी सध्या जोरात चालू आहे त्यामुळे इच्छुक सुद्धा जास्त प्रमाणात आहेत पण धुनकवड पंचायत समिती गणातून उच्चशिक्षित व कर्तव्यदक्ष तरुण उमेदवार रामलिंग मुंडे यांच्या नावाचीच सर्वत्र सर्वसामान्य नागरिकांत चर्चा चालू आहे त्यांनी आतापर्यंत सर्वसामान्य जनतेसाठी खूप मोलाचे कार्य केले आहे लोकांच्या सुख दुःखात सहभागी होऊन त्यांना पान २ वर

# पार्श्वभूमी

**नवगण महाविद्यालयात संत जगनाडे महाराज जयंती उत्साहात साजरी**

राजुरी दि.८ (प्रतिनिधी)– नवगण महाविद्यालयात संत जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. समाजप्रबोधन, समता आणि सेवा यांचे आदर्श मांडणारे संत जगनाडे महाराज यांच्या जीवनकार्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून देण्यासाठी महाविद्यालयाने विशेष उपक्रम राबवले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे यांनी उपस्थित राहून संतांच्या कार्यातील मानवतावादी दृष्टिकोनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पान २ वर



# दोन कार एकमेकीवर धडकून भीषण अपघातात दोन महिलांसह एक ठार

माजलगाव दि ८ (प्रतिनिधी) - तालुक्याच्या शेजारी असलेल्या परभणी जिल्ह्यातील रहाटी गावाजवळ दोन कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातामध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर दोन जण गंभीर जखमी झाले. ही घटना शुक्रवारी मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, बाबाराव दतराव साखरे हे कार एमएच ३८ एडी ३५४१ क्रमांकाच्या कारने आरळहून परभणीकडे जात होते. दरम्यान, समोरून येणाऱ्या क्रमांक एमएच




२२ बीसी ७८८८ या क्रमांकाच्या कार चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगात गाडी चालवत जोरदार धडक दिली. धडकेचा आवाज प्रचंड मोठा आवाज आल्याने परिसरातील नागरिक घटनास्थळी दाखल झाले. या अपघातात बाबाराव दतराव साखरे, कांताबाई अंबात कोतोरे (दोघे, रा. आरळ, ता. वसमत), विमलबाई बालासाहेब जाधव (रा. पिंगळी, ता. परभणी) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# तहसीलदार शेळके यांच्या मध्यस्थीने गेली अनेक वर्ष रखडलेल्या रस्त्याचा प्रश्न सुटला

चौसाळा दि ८ (प्रतिनिधी) - चौसाळा पासून जवळच असलेल्या देवी बाभळगाव येथील देवी बाभळगाव देवराव वस्ती मार्ग हिंदी खुर्द हा रस्ता गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला होता. शेवटी तहसीलदार शेळके यांनी भेट देऊन रस्त्याचा हा प्रश्न मार्गी लावला. आ.संदीपभैया क्षीरसागर यांच्यासह कै.रामदास पाटील जोगदंड यांनी या रस्त्यासाठी अतोनात प्रयत्न केले होते. तर देवी बाभळगावच्या सरपंच स्वातीताई प्रदीप जोगदंड यांनी पदभार स्विकारताच या रस्त्याच्या कामासाठी मंजुरी दिली होती .पण काही अडचणीमुळे हा रस्ता होऊ शकत नव्हता पण सर्व शेतकऱ्यांनी मिळून रस्ता कामासाठी सर्वोच्च प्रधान्य देणारे बीड तहसीलचे तहसीलदार शेळके यांची भेट घेऊन हा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला लागलीच तहसीलदार साहेब यांनी





यासंदर्भातील सर्व शेतकऱ्यांना एकत्रित करून रस्त्याविषयी येणाऱ्या अडचणी समुच्चाराने सोडवून स्वतः उभे राहून या रस्त्याचे काम सुरुवात करून दिले व लागलीच हा रस्ता आठ दिवसाच्या आत पूर्ण वाहतुकीसाठी चालू झाला. तो पाहण्यासाठी दि.५ डिसेंबर रोज गुरुवार रोजी स्वतः तहसीलदार साहेबांनी या रस्त्याला भेट देऊन पाहणी केली यावेळी उपस्थित मंडळ अधिकारी नाईकवाडे, देवी बाभळगाव चे तलाठी निर्मळ, रामहरी आंधळे सखाराम पाटील पान २ वर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मूलमंत्र आजही समाजाला दिशा देतो–मोदी

अंबाजोगाई दि ८ (प्रतिनिधी) :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील महामानव यांच्या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या चौकास अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी अभिवादन कार्यक्रमात बोलताना समता आणि माणसांच्या सन्मानासाठी डॉ.बाबासाहेबांनी दिलेला अथक लढा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील, सामाजिक कार्यातून त्यांचं स्वप्न पूर्ण करण्याच्या वचनबद्धतेसाठी आम्ही व आमचे सर्व सहकारी काम करीत आहोत, महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मूलमंत्र आजही समाजाला दिशा देतो असे नमूद केले. यावेळी लोक विकास महाआघाडीतील सहभागी घटक पक्षाचे नेते डॉ.नरेंद्र काळे, महेंद्र निकाळजे, सुनिल जगताप,




ऍड.शिवाजी कांबळे, बबनराव लोमटे, अमर देशमुख, शहेबाज म.फारूख मणियार, विशाल विजयकुमारजी जाजू, ॲड. इस्माईल गवळी, डॉ.राजेश इंगोले, शेख जिलानी महेबुब, दिनेश भराडीया, भिमसेन लोमटे, सय्यद ताहेर अब्दुल गफ्फार, सुनिल वाघाळकर, विशाल पोटभरे, दत्ताभाऊ सरवदे, सचिन जाधव, सुगत सरवदे, आकाश कराड, हमीद चौधरी, राजपाल जावळे, अंकुश हेडे, सरवदे सर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## जिल्हा शल्यचिकित्सक व उपसंचालकांनी चिंचवण ग्रामीण रुग्णालयाची घेतली झाडाझडती

वडवणी( प्रतिनिधी):- वडवणी तालुक्यातील चिंचवण ग्रामीण रुग्णालयात अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी असे एकुण ३६ पदे मंजुर आहेत, रुग्णालया तील कर्मचारी, वारंवार हजर असतात अशा तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक व संचालक यांनी चिंचवण ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन तक्रारीची पाहणी केली. रुग्णालयातील अधिकारी व




कर्मचारी यांची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास कार्यवाहीसाठी पाठवण्यात आला, झालेल्या तक्रारीची जिल्हा शल्य चिकित्सक व उपसंचालक यांनी तात्काळ दखल घेऊन कार्यवाही केल्याबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे, तसेच रुग्णालयातील कामगिरीही सुधारण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## दीपक देशमुख यांनी पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन केली पोलीस संरक्षणाची मागणी

बीड दि ८ (प्रतिनिधी) - परळी वैजनाथ नगर परिषद निवडणूक २०२५ पार्श्वभूमीवर वाढत्या तणावाच्या परिस्थितीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख व त्यांचे पती दीपक रंगनाथ देशमुख यांनी सोमवारी बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन पोलिस संरक्षण देण्याची औपचारिक मागणी केली. या संदर्भात २९ नोव्हेंबर २०२५ रोजीच संरक्षणाची मागणी करण्यात आली होती. तसेच खासदार बजरंग सोनवणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे संरक्षण देण्याची विनंती केली होती. याची प्रत माहितीस्तव बीड पोलीस अधीक्षकांकडेही पाठविण्यात आली आहे. मात्र अद्याप प्रत्यक्ष संरक्षण उपलब्ध झाले नसल्याने आज पुन्हा मागणी करण्यात आली.दरम्यान, परळी वैजनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीला अवघे काही दिवस उरले असताना परिसरात तणावाचे वातावरण निर्माण होऊ नये तसेच कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, या हेतूने संरक्षण मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. पान २ वर

## वा..रे...बीड नगरपालिका बलभीम कॉलेज परिसरात कचऱ्याच्या ढिगाऱ्यामूळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात

बीड दि.८(प्रतिनिधी):-शहरातील बलभीम महाविद्यालय परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचले असून, यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे आरोग्य गंभीरपणे धोक्यात आले आहे. या गंभीर समस्येकडे बीड नगर परिषदेने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप विद्यार्थी वर्गातून तीव्रतेने केला जात आहे.

महाविद्यालय परिसरात मुख्य रस्त्या लगतच हा कचरा साचलेला आहे. या कचऱ्यातून प्रचंड दुर्गंधी येत असून, यामुळे विद्यार्थ्यांना रोज ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक विद्यार्थ्यांना नाकावर रुमाल बांधून या भागातून जावे लागते. कचऱ्याच्या या ढिगाऱ्यामुळे परिसरात डास, माश्या आणि किटकांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांना साथीचे रोग, त्वचेचे आजार आणि श्वसनाचे विकार होण्याची पान २ वर



## प्रियंका व किरण यांचा विवाह सोहळा उत्साही वातावरणात संपन्न



गेवराई दि.८ (प्रतिनिधी) :- गेवराई शहरातील युवा नेतृत्व प्रल्हाद अंकुश वादे यांची मुलगी व पत्रकार शुभम घोडके यांची मानलेली बहीण चि.सौ.कां.प्रियंका व अशोक रंगनाथ बनसोडे यांचे चिरंजीव किरण यांचा शुभविवाह शुक्रवार पान २ वर

## ग्रामरोजगार सेवकास जिवे मारण्याचा प्रयत्न तरीही राजकीय दबावापोटी गुन्हा नोंद होईना



बीड दि.८(प्रतिनिधी)- गेवराई तालुक्यातील नादलगाव येथील आदिवासी समाजातील ग्रामरोजगार सेवकाला जातिवाचक शिविगाळकरून गावातील काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी दोन्ही पाय मोडून मारहाण केल्याची घटना दि ६ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे.बीडचे पालकमंत्री बदलले, एसपी बदलले तरीही जिल्हात वर्दीचा धाक राहिलेला नाही त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचे तीन तेरा झालेले पाहिला मिळत आहे. त्यामुळे गृह प्रशासन बीड जिल्ह्या कडे लक्ष देणार का ?असा सवाल देखील उपस्थित होत आहे.जालिंदर सुरवसे वय ३५ वर्षे याला घरात घुसून अश्रुबा उत्तम राऊत, गोविंद सखाराम राऊत , भगवान अश्रुबा राऊत, विष्णू अश्रुबा राऊत याच्यासह गावातील काही जणांनी जालिंदर सुरवसे यांना पान २ वर

## समाजसेवक आजीनाथ गवळी यांच्या स्नेहभेटीला पुणेकरांचा उदंड प्रतिसाद



शिरूर कासार दि ८(प्रतिनिधी)- रुग्णसेवा आणि विविध सामाजिक कार्यात सतत सक्रिय असलेले सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ भाऊ गवळी यांनी पुणे येथे वास्तव्यास असलेल्या आपल्या मित्रपरिवाराशी संवाद साधण्यासाठी स्नेहभेट दौरा आयोजित केला.या दौऱ्यास पुणेकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामान्य जनतेच्या अडीअडचणी, सुख-दुःखात नेहमी सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपणारे आजीनाथ गवळी हे कार्यासोबत जनसंपर्कही तेवढ्याच जिव्हाळ्याने टिकवून ठेवतात. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी पुणे व परिसरात स्थायिक झालेल्या आपल्या भागातील मित्र, कार्यकर्ते व नागरिकांची भेट घेतली. या दौऱ्यादरम्यान त्यांनी रांजणगाव, यवत, खामगाव फाटा, हडपसर, कात्रज, डांगे चौक, मोशी, भोसरी, चिंभळी फाटा, चाकण आणि शिक्रापूर या भागांना भेटी दिल्या.या स्नेहभेट दौऱ्यामुळे जुन्या नात्यांना नवी ऊर्जा मिळाली. यावेळी स्नेहभेट दौऱ्यामधे पोलीस पान २ वर

# अंबाजोगाईतील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

### स.पा.चे ॲड.शिवाजी कांबळे,राजेश परदेशी यांचे निवेदन

अंबाजोगाई दि ८ (प्रतिनिधी)-अंबाजोगाई शहरात मोकाट कुत्र्यांनी चावा घेऊन एका ८ वर्षीय मुलीला गंभीर जखमी केल्याची दुर्दैवी घटना रविवारी घडली. त्यामुळे अंबाजोगाई शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ऍड.शिवाजी कांबळे, अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सोमवार, दिनांक ८ डिसेंबर रोजी उपजिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

यासंदर्भात समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे, अंबाजोगाई



शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले की, सदरील विषयासंदर्भात यापूर्वीच समाजवादी पार्टीच्या वतीने अंबाजोगाई नगरपरिषदेला निवेदन देवून पुर्वकल्पना दिली होती. परंतु, वेळीच उपाययोजना करण्यात न आल्याने आज अंबाजोगाई पान २ वर

## दिव्यांग शाळेसह दिव्यांगाच्या विविध मागण्यासाठी हिवाळी अधिवेशनावर डॉ.जितेंद्र ओव्हाळ यांनी काढला मोर्चा

बीड (प्रतिनिधी):-राज्यात दिव्यांग मंत्रालय कार्यरत असून नसल्यासारखे असल्याचे सांगत दिव्यांग आयुक्त कार्यालयावर कोणतंही नियंत्रण नाही खुलेआम बोगसगिरी आणि अनियमितता होत असल्यामुळे शेकडो दिव्यांग शाळा दिव्यांग शाळा शिक्षक कर्मचारी यांचे बेहाल चालू आहेत. एकाही कर्मचाऱ्यांना सेवा हामी नाही, सेवा हामी द्या अनुदान धोरणाची अंमलबजावणी वेळेवर होत नाही त्रुटीपूर्तता च्या नावाखाली धोरणाची वाट लावली जात आहे. त्याच बरोबर समायोजन प्रक्रियेत घोटाळे होत आहेत. पान २ वर






बीड- संत जगनाडे महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यातआली. यावेळी रामेश्वर पवार,आनंद क्षिरसागर, देवा पेंढारे,बालाजी पवार,अतुल गडगिळे,योगेश पवार,राजू क्षिरसागर,पांडुरंग कुरे,नवनाथ गोरे,शिवलिंग क्षिरसागर अमर रायते,रवी रणखांब,संतोष रणखांब,गणेश पवार,राजू क्षीरसागर,सचिन पवार.

## शिवसेना शिंदे गटाचे वांगे फाटा येथे आंदोलन



बीड दि ८(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील वांगी व राजुरी फाटा तसेच वांगी काठोडा रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून सदर रस्ता ८ डिसेंबर पर्यंत पूर्ण केलं नाही तर आंदोलन केले जाईल असा इशारा देऊन देखील याची दखल न घेतल्याने हरिभाऊ शेळके यांच्या नेतृत्वाखाली नाळवंडी सर्कल मधील वांगी फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी शिंदे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. वांगी व राजुरी फटा या ठिकाणी वांगी कठोडा रोड याची दूरअवस्था पाहता कठोडा व वांगी गांव चे ग्राममस्त पान २ वर

## श्रीकांत नवले यांनी मोफत रुग्णवाहिका गावकऱ्यांच्या सेवार्थ देऊन वाढदिवस केला साजरा

बीड दि.८(प्रतिनिधी):- स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पार पडल्या या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट नवनिर्वाचित राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांत ( नाना ) नवले यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला या वेळी युवक संघटना बळकट करण्यासाठी बीड जिल्ह्यात युवक पदधिकायाची नियुक्ती करण्यात आली होती .त्यात नवनिर्माण जिल्ह्यात जिल्हा उपाध्यक्ष पद मिळालेले श्रीकांत (नाना) नवले यांनी आपल्या वाढदिवसाच्या औचित्य साधून लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांनी पारगाव शिरस या गावात आपण गावाचे काहीतरी गावातले देणे लागतो . या विचाराने लोकांना दवाखान्यासाठी व आजारी व्यक्तींना ज्या ये करण्यासाठी लवकर बस सेवा नसते याची जाणीव ठेवून गावातील लोकांना आज दिनांक ८ डिसेंबर २५ रोजी त्यांनी वाढदिवसाच्या औचित्य साधून एक वेगळी खर्चाला आळा देत गावकऱ्यांच्या सेवेसाठी




निःशुल्क (रुग्णसेविका मोफत )बीड जिल्हाध्यक्ष बळीराम (आप्पा ) गवते पाटील यांच्या हस्ते पदार्पण केली. यावेळी गावेतील सरपंच दिनकर बापू जमदाडे , नारायण गड विश्वस्त गोवर्धन काशीद , पान २ वर